# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 38) 15th November 2013 (No. of Pages 24 ) ( No : 15


# न्यायालयीन संघर्षावरून लक्ष विचलित करणारी कोणतीही व कोणाचीही खेळी यशस्वी होऊ देता कामा नये


**प्रा.बी.टी.देशमुख,**

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


नेटसेटमुक्त शिक्षकांच्या प्रश्नावर न्यायालयामध्ये जबरदस्त संघर्ष सुरू असतांना व शासनाच्या याबाबतच्या आकसपूर्ण भूमिकेला न्यायालयात एकामागून एक तडाखे बसत असतांना अचानक "गुणवंत प्राध्यापकांच्या संघटनेचे पुणे उपकेंद्र" गेल्या काही दिवसात एकाएकी सक्रिय झाले असून त्यांनी मोठ्या प्रमाणात 'पुड्या' सोडण्याचे काम सुरू केलेले दिसते. संघटनांचे पदाधिकारी व संबंधित शिक्षक यांचे लक्ष न्यायालयीन संघर्षाकडून विचलित करून वृत्तपत्रातून वादविवाद करण्यामध्ये त्यांना ओढण्याचा त्यांचा हेतू साध्य होता कामा नये याची संघटनांनी, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व संबंधित शिक्षकांनी काळजी घेण्याची गरज आहे. "नेट-सेट प्रकरणी 'युजीसी'चीही मनमानी" या मथळ्याखाली गुणवंत प्राध्यापकांनी जी 'पुडी' सोडली आहे त्यामध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांच्या नावावर जो गौप्यस्फोट सांगण्यात आला आहे **त्यात गौप्यस्फोट काहीही नसून त्या गौप्यस्फोटाच्या मागील घटनाक्रम समजून घेतला तर तो गौप्यस्फोट नसून एक मोठा हास्यस्फोट किंवा हास्यास्पद स्फोट आहे हे कोणाच्याही लक्षात येईल.**

**२.** सन १९९१ ते २००० या कालखंडात विधिवतरित्या सेवेत भरती झालेल्या नेटसेट मुक्त प्राध्यापकांच्या बाबतीत सन २००२ मध्ये "चार महिन्यात निर्णय घ्या" असा मा. मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला होता पण विद्यापीठ अनुदान आयोगाने ९ वर्षे उशिराने निर्णय घेतला. दिनांक ८ जुलै २०११ रोजी आयोगाची बैठक (काही अधिकाऱ्यांची नव्हे) झाली व त्या बैठकीत महाराष्ट्रातील या शिक्षकांच्या संदर्भात नेट-सेट मुक्ततेचा निर्णय घेण्यात आला. **या बातम्या पुढच्या दोन चार दिवसात सर्वच वृत्तपत्रातून आल्या.**

**३.** विद्यापीठ अनुदान आयोगाने काहीतरी निर्णय घेतला आहे, असे वृत्तपत्रातून कळल्यावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे त्यावेळचे अध्यक्ष व सचिव यांनी दिनांक २ ऑगस्ट २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिल्ली स्थित कार्यालयात प्रत्यक्ष स्वतः जाऊन आयोगाचे सचिव व तेथील अधिकारी यांच्याशी चर्चा केली. "निर्णय झाला आहे. असे सर्वत्र बोलल्या जात आहे. चार दिवसांनी तुमच्या 'वेबसाईट'वर हा निर्णय येईल, तेव्हा तो सर्वांना कळेल. उक्त निर्णयाची प्रमाणित प्रत आम्हाला मिळाली पाहिजे कारण दिनांक ७ ऑगस्ट २०११ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक मुंबई येथे होत असून प्रमाणित प्रत मिळाल्याशिवाय त्यावर आम्हाला कोणताही विचार करता येणार नाही" असे सांगितले. **त्यावर उपरोक्त निर्णयाची प्रत प्रमाणित करून आयोगाच्या कार्यालयातर्फे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आली.**

**४. दिनांक ८ जुलै २०११ च्या बैठकीत आयोगाने जो निर्णय घेतला त्याची प्रमाणित प्रत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला २ ऑगस्ट २०११ रोजी प्राप्त झाली.** त्यानंतर ७ ऑगस्ट २०११ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बेठकीत आयोगाच्या त्या निर्णयाबाबत जो ठराव मंजूर झाला त्याच्या परिच्छेद २ मध्ये "त्या निर्णयामध्ये फक्त महाराष्ट्राचा विचार झालेला आहे व त्यातही "appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000" याचा विचार झालेला आहे. उशिरा का होईना **ही एक वेगळी विशिष्ट स्थिती आहे** हे आयोगाच्या लक्षात आले **ही समाधानाची गोष्ट आहे.**" असे व पुढे परिच्छेद ३ मध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "१९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० पावेतो महाराष्ट्रातील सर्व नेमणूका एकाच स्थितीचे दर्शन घडविणाऱ्या असतांना, समान स्थितीमध्ये समान वागणूक न देता, विद्यापीठ अनुदान आयोगाने यापूर्वी तुकड्या तुकड्याने अनेक निर्णय घेतले व त्यामुळे या वर्गवारीतील शिक्षकांची सुद्धा अनेक तुकड्यांमध्ये विभागणी झाली, विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या उपरोक्त निर्णयामुळे या वर्गातील शिक्षकांसाठी यापूर्वी घेतलेल्या निर्णयाचे अनेक तुकडे एकत्र आले असून **आता या सर्वांसाठी एकच निर्णय झालेला आहे ही सुद्धा समाधानाची बाब आहे.**"

**५.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या निर्णयामध्ये कोणत्या तारखेपासून त्या प्रत्येक शिक्षकांची सेवा धरली जाईल याबाबतचा स्पष्ट उल्लेख नव्हता ही गोष्ट लक्षात आल्यामुळे याच ठरावात महासंघाने अशी विनंती केली होती की, त्या प्रत्येक नेमणूकीला मान्यता देण्याची केलेली प्रत्येक विनंती (Representation) विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्य केलेली असतांना "हा निर्णय महाराष्ट्र शासनाला व विद्यापीठांना कळवितांना कोणतीही गोष्ट मोघमपणे कळवून चालणार नाही. या निर्णयामध्ये अंतर्भूत असलेल्या "**प्रत्येक शिक्षकाची सेवा स्थान निश्चितीच्या प्रयोजनासाठी कोणत्या दिनांकापासून धरावी?**" या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला कळविले पाहिजे अशी मागणी करण्यात येत आहे कारण तसे मा. उच्च न्यायालयाचे आदेशच आहेत व या प्रश्नाचे स्पष्ट व कायदेशीर उत्तर "**नेमणूकीच्या दिनांकापासून**" असेच आहे कारण तसे मा. सर्वोच्च न्यायालयाचेच आदेश आहेत, अतएव तसे तातडीने कळविले जावे अशी विनंती करण्यात येत आहे."

**६.** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २० एप्रिल २०११ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ या प्रकरणात पुढील प्रमाणे निर्णय दिलेला होता. :- "We direct the respondent no. 5 University Grants Commission to communicate to the State

## नेटसेट पात्रता नाही म्हणून सेवा अॅडव्हॉक म्हणता येणार नाही व जुनी पेन्शन योजना नाकारता येणार नाही


*(परिच्छेद २५ व २५.४ पहा)*

## *समान स्थितीत असलेल्या प्राध्यापकांमध्ये अत्यंत तिरस्कार उत्पन्न करणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीला जन्म देणारा लहरी व छांदिष्ट निर्णय घेऊन वंचित प्राध्यापकांचा अवसानघात करता येणार नाही*

*(परिच्छेद २६.१ पहा)*

Government **the date when such exemption became effective** as per notification dated 5/11/2008 in respect of the petitioners, within a period of three weeks" **मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयानुसार एक्झमशन हे कोणत्या तारखेपासून लागू होईल हे तीन आठवड्याच्या आत कळविणे विद्यापीठ अनुदान आयोगावर बंधनकारक होते.**

**७.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाने शुक्रवार, दिनांक १०.०६.२०११ रोजी दिल्ली येथे प्रत्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयात जाऊन १८ कायदेशीर मुद्यांचे "MEMORANDUM submitted by MFUCTO delegation to the Hon'ble Chairman UGC on 10th June 2011" या मथळ्याचे एक निवेदन (दिनांकित १० जून २०११) विद्यापीठ अनुदान आयोगाला सादर केले होते. त्यावर त्यांच्या विधिज्ञांचे मत घेऊन आयोगाने त्यांचा निर्णय केला. महासंघाने सादर केलेल्या या निवेदनांत मा. सर्वोच्च्य न्यायालयाचा निर्णय महासंघाने आयोगाच्या लक्षात आणून दिला होता तो पुढील शब्दात :-

"Once exemption from NET/SET is granted the appointment be treated as regularised. Para 24 of the judgement (delivered on 08.09.1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ. : AIR 1995 SUPREME COURT 336.) is as follows. :-

24. ...... As analyzed above, therefore the Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a specific case; or it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC's approval, in which event it would if it failed to show cause for it's failure to abide by the said Regulations to the satisfaction of the UGC, forfeit its grant from the U.G.C. If however it did show cause to the satisfaction of the U.G.C., **it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized.**"

**८.** वर परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे नेटसेटमुक्तता कोणत्या तारखेपासून लागू होईल हे तीन आठवड्याच्या आत कळविणे विद्यापीठ अनुदान आयोगावर बंधनकारक होते. एकदा नेट-सेटमुक्तता दिल्यानंतर त्या शिक्षकाची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून नियमित होईल (stand regulanized) असे मा. सर्वोच्च्य न्यायालयाच्या निर्णयात म्हटलेले आहे तो निर्णय वर परिच्छेद ७ मध्ये नमूद केलेला आहे. (या दोनही निर्णयांचा यापुढे उल्लेख "मा. उच्च न्यायालयाचा व मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय" असा)

**९.** आता दिनांक २५ व २६ ऑगस्ट २०११ रोजी दिल्ली येथे घडलेल्या घटनाबाबत माहिती करून घेऊ. मा. उच्च न्यायालयाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाने तत्परतेने आदेश निर्गमित करावे यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली जवळ जवळ पाच हजार शिक्षक दिल्ली येथे त्यादिवशी जंतरमंतरवर धरणे धरून बसले होते. त्यादिवशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाने मानव संसाधन मंत्री मा.श्री. कपिल सिब्बल यांची भेट घेऊन त्यांना एक निवेदन दिले. त्या निवेदनाच्या परिच्छेद ३ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या व परिच्छेद ५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयांची माहिती देण्यात आली होती व परिच्छेद ६ मध्ये मा. मंत्रिमहोदयांना पुढील प्रमाणे विनंती करण्यात आली होती.:-

"6. Hundreds of college teachers from Maharashtra are assembled, to day at Jantar Mantar in New Delhi, requesting the UGC for appropriate action. In the light of the above stated points, we now request you that :-

The UGC be directed to communicate to the state of Maharashtra the date (Which could only be the date of appointment for the reasons mentioned in para 5 above) of the effect of the said approval of the UGC arising out of it's decision at item no. 2.09 of its 479th meeting held on 8th July 2011 as directed by the Hon'ble High Court, as mentioned in para 3 above."

**१०.** एकदा विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेटमुक्तता दिली की, **"ती कोणत्या तारखेपासून लागू करावी हे कळविणे, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगावर बंधनकारक होते व ती तारीख म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या शिक्षकांच्या नेमणूकीची तारीखच असू शकते."** सर्वोच्च न्यायालयाचा हा १९९४ मधील निर्णय होता. सन १९९१ ते २००० या काळातील नेट-सेटमुक्त शिक्षकांची सेवा इतर सर्व प्रयोजनासाठी (वार्षिक वेतनवाढी वगैरे) नेमणूकीच्या पहिल्या दिनांकापासून धरली जातच होती. फक्त ती स्थाननिश्चितीसाठी धरली जात नव्हती. हा अन्याय दूर व्हावा म्हणून "The services of these teachers must be counted for all purposes from the date of appointment." हीच संघटनेची मुख्य मागणी होती. त्या दिवशी दिल्लीला तेवढाच विषय होता. मी स्वतः काय किंवा संघटनेचे पदाधिकारी काय त्यादिवशीच्या जाहीर भाषणात तेवढाच विषय बोलत होतो. मा. कपिल सिब्बल यांना व विद्यापीठ अनुदान आयोगाला दिलेल्या लेखी निवेदनात आम्ही त्यापूर्वी वारंवार हे मत मांडले होते व त्यादिवशीही तेच

keeping away the petitioners cases from being considered for the benefit of exemption with reference to the directions of the HRD Ministry

**would give rise to invidious discrimination among similarly situated persons under the capricious decisions leaving the petitioners in lurch.**

*( See Para 29 of the High Court Judgement on page 236 of 2013 NUTA Bulletin )*

The Joint Director filed a written statement and contended that approval has been granted to the appointment of the petitioner's husband on probation by the University subject to condition of the petitioner's husband passing NET/SET examination.

*( See Para 4 of the High Court Judgement on page 218 of 2013 NUTA Bulletin )*

मत मांडत होतो. वेळोवेळी झालेल्या चर्चेमध्ये सुद्धा तेच प्रतिपादन केले होते. दिल्लीतील धरणे आंदोलनाच्या वेळी तसेच त्यापूर्वी व त्यानंतर झालेल्या अनेक भाषणातून "**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे पहिल्या दिवसापासून सेवा धरावीच लागेल" असे प्रतिपादन आम्ही सर्वच जण करीत होतो.**

मा. श्री. कपिल सिब्बल व विद्यापीठ अनुदान आयोगाला दिलेल्या लेखी निवेदनात व त्यांच्याशी झालेल्या तोंडी बोलण्यात, जंतरमंतरवरील सभेत, त्यादिवशी सकाळी किंवा दुपारी, कार्यालयात किंवा कार्यालयाच्या बाहेर, रेल्वे स्टेशनवर किंवा विमानतळावर आम्ही एकसारखाच विचार मांडत होतो. हेच यावरून लक्षात येईल. तेव्हा माझ्या अशा कोणत्याही भाषणातील उल्लेख नमूद करून मी काहीतरी गौप्यस्फोट केला असे प्रतिपादन करणे हास्यास्पद आहे. जाहीरपणे व ठामपणे प्रतिपादन केलेली ती आमची मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर आधारित भूमिका होती, त्यासाठी लहानशी "व्हीडीओ फित" फक्त कोणाजवळ उपलब्ध असेल तर त्यांना आमच्या भाषणाच्या अनेक ठिकाणच्या व्हीडीओच्या पूर्ण प्रति उपलब्ध होऊ शकतील. "संघटनेच्या काही संदस्यांशी बोलतांना मी हा किस्सा सांगितला" हा उल्लेख सुद्धा बरोबर नाही. मी अनेक जाहीर सभांमधून संघटनेची उपरोक्त मागणी ठामपणे व दृढनिर्धारपूर्वक मांडली. **१९९४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारावर विधानपरिषद सभागृहामध्ये गेली अनेक वर्षे व अनेक वेळा हे प्रतिपादन मी केलेले आहे. तेव्हा यात कोणताही गौप्यस्फोट नसून पूर्ण माहितीच्या अभावी करण्यात आलेला तो एक हास्यस्फोट किंवा हास्यास्पद स्फोट होय असे म्हणणे जास्त उचित होईल.**

**११.** "प्राध्यापक संघटनेला युजीसीकडून मिळालेली दोनही पत्रे ही सहसचिव बी.के.सिंग यांनी स्वाक्षरीत केलेली आहेत. **मात्र दोनही पत्रावर सिंग यांची स्वाक्षरी वेगळी दिसत आहे**" अशी आणखी एक पुडी गुणवंत प्राध्यापकांनी सोडून दिलेली आहे. त्या पुडीतच "२६ ऑगस्टचे हे पत्र युजीसीच्या अधिकृत लेटर हेडवर नाही" अशीही त्यांची लाडीक तक्रार आहे. २६ ऑगस्टचे हे पत्र बनावट आहे असे स्पष्टपणे म्हणण्याचे धैर्य गुणवंत प्राध्यापकांना झाले नाही पण त्यांनी तसे भासवण्याचा जोरदार प्रयत्न चालविला आहे. त्यांची माहिती जर प्रामाणिकपणाची व खरी आहे असे ते समजत असतील तर त्यांनी **तसे शपथपत्र न्यायालयासमोर दाखल करणे हा राजमार्ग वापरण्याचे सोडून पुड्या सोडण्याचा वाममार्ग कां स्वीकारावा हे न समजण्यासारखे आहे.**

**१२.** संघटनेच्या वतीने मा. उच्च न्यायालयासमोर दिनांक १० मे २०१३ रोजी जे शपथपत्र दाखल करण्यात आले त्यात १६ ऑगस्ट व २६ ऑगस्ट २०११ च्या दोनही पत्राचा मजकूर प्रतिज्ञेवर महासंघाच्या सरकार्यवाहांनी नमूद केलेला आहे. गुणवंत प्राध्यापकांच्या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वतः त्या दिवशी न्यायालयात हजर होते. त्या दिवशीच्या मा. न्यायालयाच्या निर्णयामध्ये त्यांच्या उपस्थितीची नावानिशी व पदानिशी नोंद आहे. "२६ ऑगस्टचे हे पत्र बनावट आहे" असे शपथपत्र दाखल करण्याचे परिणाम काय होतात हे त्यांना ठाऊक असल्याने त्यांनी तसे केले नाही हे आपण समजू शकतो. पण मग निदान "या दोन पत्रावरची स्वाक्षरी वेगळी दिसते. २६ तारखेचे पत्र अधिकृत लेटरहेडवर नाही" एवढे **प्रतिज्ञापत्र त्यांनी दाखल करायला कोणतीही हरकत नव्हती पण त्यांनी तसे केले नाही, व आता 'पुड्या' सोडण्याच्या मार्गाचा अवलंब ते करीत आहेत.**

**१३.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या वतीने १९ ऑगस्ट २०१३ रोजी एक याचिका (सन २०१३ ची याचिका क्रमांक २०८२) दाखल केली असून या याचिकेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाचे १६ ऑगस्ट २०११ चे व २६ ऑगस्ट २०११ चे पत्र अनुक्रमे सहपत्र आय व आय-१ म्हणून याचिकेच्या पेपरबुकात पृष्ठ १६८ ते १७१ वर दाखल केलेले आहे व त्यांच्या सत्यतेबाबतचे कथन नमूद असलेले संघटनेच्या सरचिटणीसांचे शपथपत्र प्रतिज्ञेवर सादर करण्यात आलेले आहे. मुंबई, नागपूर, औरंगाबाद येथील खंडपीठासमोर अनेक याचिकांमध्ये ती दोनही पत्रे सहपत्रे म्हणून जोडलेली आहेत. "दिनांक २६ ऑगस्टच्या पत्रावरील स्वाक्षरी जूळत नाही किंवा ते लेटहेडवर नसल्यामुळे बनावट आहे." असे प्रतिज्ञापत्र गुणवंत प्राध्यापकांना अजूनही कोणत्याही खंडपीठासमोर दाखल करता येईल.

**१३.१ दिनांक ५ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील एकूण ८३७ प्राध्यापकांना नेटसेट मुक्तता प्रदान केली होती.** त्याबाबत पुढे काहीच कारवाई होत नव्हती. त्यामुळे डिसेंबर २००८ च्या विधानपरिषदेच्या नागपूर अधिवेशनात या विषयावरील लक्षवेधी सूचना दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी चर्चेला आली. लक्षवेधी सूचनेवरील अनुपूरक चर्चेमध्ये उच्च शिक्षण मंत्री मा.श्री. राजेश टोपे यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले :- "सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यानी जे तीन प्रश्न विचारलेले आहे त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे **तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी आर काढण्यात येईल. जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.** आपला अधिवेशनाचा कालावधी त्या दरम्यानचा राहील असे वाटते तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदरच हा जी आर काढण्यात येईल. त्याचबरोबर अधिव्याख्यात्यांना नियमित करण्याचे विद्यापीठाचे काम सुरू आहे. विद्यापीठाला सुध्दा सभागृहाच्या भावना कळविण्यात येतील तसेच **हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल."** त्यानंतर त्यांनी पुढे असेही सांगितले की, "सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, यांची स्थान निश्चिती करणे हा यातील महत्त्वाचा प्रश्न आहे आणि ते कॅसचे काम आहे आणि **हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे. त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल."** विद्यापीठाने पुढील एक महिन्यात स्थाननिश्चितीचे काम पूर्ण केले की केले नाही हे कळू शकले नाही पण उच्च शिक्षणमंत्र्यांनी २४ डिसेंबर २००८ च्या आत याबाबत शासननिर्णय काढतो असे सांगितले, तो आजपर्यंत काढला नाही.

**१३.२** विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट मुक्तता दिली. पण राज्यशासनाकडून म्हणजेच सहसंचालकांकडून काहीच कारवाई होत नसल्याने संघटनेतील एक ज्येष्ठ कार्यकर्ते चंद्रपूर येथील **प्रा.टिकाराम देवाजी कोसे** यांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांसह मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर

Therefore, the contention raised in the communication dated 20th June 2011 that the appointment of the petitioner's husband appears to be on adhoc basis is baseless.

*( See Para 8 of the High Court Judgement on page 218 of 2013 NUTA Bulletin )*

दिनांक २५ ऑगस्ट २०१० रोजी एक याचिका दाखल केली (सन २०१० ची याचिका क्रमांक ४९०९) अर्जदारांचे मुख्य म्हणणे असे होते की "विद्यापीठ अनुदान आयोगाने आता नेट-सेट मुक्तता घोषित केल्यामुळे ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरून स्थाननिश्चितीचे (CAS) सर्व लाभ अर्जदारांना अदा करण्यात आले पाहिजेत." या प्रकरणाचा दिनांक २० एप्रिल २०११ रोजी न्यायालयात निर्णय झाला. या प्रकरणात शासनाचे काय म्हणणे होते ते मा. न्यायालयाच्या निर्णयातच नमूद आहे. ते पुढील शब्दात :- "Shri Sambre, learned Government Pleader for respondent nos. 1 to 3, states that though exemption is granted from clearing NET/SET examination vide notification dated 5/11/2008 issued by the University Grants Commission, however, the date of exemption in respect of passing of NET/SET examination has not been specifically mentioned in the said notification nor the petitioners are provided the said date and in absence thereof, the State Government could not decide the claims of the petitioners for grant of benefits under Career Advancement Scheme. It is submitted that if the said date is made known to the State

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY
# BENCH AT AURANGABAD
# WRIT PETITION NO.6659 OF 2013

**(1)** Dr.Uttam Pralhadrao Dolhare, age: 49 years, Occ: service;**(2)** Dr.Ambadas Sheshrao Kadam, age: 43 years, Occ: service; **(3)** Dr.Shaikh Isakh Shaikh Maheboob, age: 45 years, Occ: service; **(4)** Dr.Bhagwat Gangadharrao Thakre, age: 44 years; Occ: service; **(5)** Dr.Nivrutti Govindrao Papatwar, age: 41 years, Occ: service; Petitioners No.1 to 5 R/o Dnyanopasak Shikshan Mandal's Dnyanopasak College of Arts, Commerce and Science, Jintur, Tq.Jintur, Dist.Parbhani. **(6)** Dr.Ranjit Ramrao Jadhav, age: 43 years, Occ: service, R/o Shabdankur Yamuna Society, Old Ausa Road, Latur. **(7)** Dr.Vyankat Pomaji Chavan, age: 44 years, Occ: service; **(8)** Dr.Shrinivas Kishanrao Pawar, age: 43 years, Occ: service; **(9)** Pandit Anandrao Shinde, age: 48 years, Occ: service; Petitioners No.7 to 9 R/o Vimukta Jati Seva Samiti's Gramin Arts, Commerce and Science Mahavidyalaya, Vasantnagar, Tq. Mukhed, District Nanded. **(10)** Dr.Ajay Rustumrao Tengse, age: 43 years, Occ: service, R/o Yeshwant Mahavidyalaya, Nanded, Tq. & Dist. Nanded..... ***Petitioners*** **VERSUS (1)** The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. **(2)** Director of Higher Education, Maharashtra State, Pune.**(3)** Joint Director of Higher Education, Nanded Region, Nanded. **(4)** Swami Ramanand Tirth Marathwada University, Vishnupuri, Nanded, through its Registrar. **(5)** University Grants Commission, Bahadur Shah Jafar Marg, New Delhi110002, through its Secretary. **(6)** Dnyanopasak Shikshan Mandal's Dnyanopasak College of Arts, Commerce and Science, Jintur, Tq.Jintur, District Parbhani, through its Principal. **(7)** Dayanand Shikshan Prasarak Mandal's Babhalgaon, Latre Venkatrao Deshmukh Mahavidyalaya, Babhalgaon, Tq. & Dist. Latur, through its Principal. **(8)** Vimukta Jati Seva Samiti's Gramin Arts, Commerce and Science Mahavidyalaya, Vasantnagar, Tq. Mukhed, District Nanded, through its Principal. **(9)** Sharda Bhavan Education Society's Yeshwant Mahavidyalaya, Nanded, Tq. & Dist. Nanded, through its Principal. ......**Respondents**

Mr.V.J.Dixit, Senior Counsel i/by Mr.Nitin S. Kadam, advocate for petitioners. : Mr.S.K.Kadam, A.G.P. for Respondents No.1 to 3.: Mr.V.P.Latange, advocate for Respondent No.4.: MrAlok Sharma, Assistant Solicitor General for Respondent No.5.: Mr.R.R.Mantri, advocate for Respondent No.9. Respondents No.6, 7 and 8 served.

**WITH WRIT PETITION NO.7629 OF 2013** :- Dr. Sunita Dhundiraj Lohare, age: 43 years, Occ: service, R/o Bharat Liberal Education Society's Shri Havagiswami College, Udgir, Tq. Udgir, District Latur.....***Petitioner*** **VERSUS (1)** The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. **(2)** Director of Higher Education, Maharashtra State, Pune. **(3)** Joint Director of Higher Education, Nanded Region, Nanded. **(4)** Swami Ramanand Tirth Marathwada University, Vishnupuri, Nanded, through its Registrar. **(5)** University Grants Commission, Bahadur Shah Jafar Marg, New Delhi110 002, through its Secretary. **(6)** Bharat Liberal Education Society's Havagiswami College, Udgir, Tq. Udgir, District Latur, through its Principal. ......**Respondents**

Mr.V.J.Dixit, Senior Counsel i/by Mr.Nitin S. Kadam, advocate for the petitioner. : Mr.S.K.Kadam, A.G.P. for Respondents No.1 to 3. Mr.V.P.Latange, advocate for Respondent No.4. : Mr.Alok Sharma, Assistant Solicitor General for Respondent No.5. : Mr.M.P.Tripathi, advocate for Respondent No.6.

## CORAM : R.M.BORDE & SUNIL P.DESHMUKH, JJ.
## DATE :10th October, 2013.
## ORAL JUDGMENT (Per Sunil P. Deshmukh, J.):

1 Heard. Rule. Rule made returnable forthwith and heard finally by consent of learned Counsel for respective parties.

2 There is no dispute raised in the matter about the factual position that the **petitioners have been appointed during the period 1991 to 2000,** by following due procedure i.e. through advertisement, selection by duly constituted committee and that the petitioners possess all other qualifications except NET / SET.

3 In a group of writ petitions bearing No. 5271 of 2013 with connected writ petitions decided on 28.8.2013, this court had an occasion to deal with similar situation wherein, letters as impugned in present petition, dated 6.6.2013 had been issued to the petitioners, requiring refixation of their pay scales pursuant to government resolution dated 18.10.2001. This court, having regard to the recent resolution issued on 27.6.2013 by the government of Maharashtra, had held that the communications issued pursuant to the government resolution dated 18.10.2001, are unsustainable.

4 In the present case, there does not appear to be any dispute about that the petitioners fulfill requirements referred to in the government resolution dated 27.6.2013.

5 Having regard to aforesaid and the decision of this court in group of writ petitions referred to hereinabove, **the impugned communication dated 6.6.2013 in case of present petitioners are unsustainable and cannot be allowed to be maintained.**

6 Accordingly, the communications dated 6.6.2013 (Exhs. "S" and "J" to respective writ petitions), **issued by respondent no. 3 are, quashed and set aside. Eventually, detained salaries of petitioners be released as early as possible.**

7. Rule is made absolute in aforesaid terms. There shall be no order as to costs.

**SUNIL P. DESHMUKH J R.M.BORDE J**

** AF : P 89 **

Government by the University Grants Commission, the claims of the petitioners for grant of benefits under the Career Advancement Scheme **can be considered** in accordance with law and procedure applicable in this regard."

१३.३ या प्रकरणात विद्यापीठ अनुदान आयोगाचे म्हणणे काय होते हे सुद्धा या निर्णयातच नमूद आहे. ते पुढील शब्दात :- "Shri Mishra, learned Assistant Solicitor General for respondent no.5, states that if the State Government requests the University Grants Commission to declare the said date of exemption or provide information in this regard, the same shall be provided to the State Government as per direction of this Court."

## NET - SET CASES
## JUDGEMENTS PRONOUNCED

**(1) W.P. No. (L) 1326 OF 2012 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION WRIT PETITION (LODGING) NO.1326 OF 2012 Akhil Bharatiya Vidyarthi Parishad and anr. .. Petitioners. Versus The State of Maharashtra and ors. .. Respondents CORAM : MOHIT S. SHAH, C.J. & M.S. SANKLECHA, J.DATE : 10 May 2013. **Judgment circulated on page 61 of 2013 NUTA Bulletin.**

**(2) W.P. No. 11477 OF 2010 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.11477 OF 2010 CORAM : A. H. JOSHI & SUNIL P. DESHMUKH, JJ. JUDGMENT RESERVED ON 23RD JULY, 2013. JUDGMENT PRONOUNCED ON 1ST AUGUST, 2013 ORAL JUDGMENT ( PER A.H. JOSHI, J ) **Judgment circulated on page 114 of 2013 NUTA Bulletin.**

**(3) W.P. No. 5271 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.5271 OF 2013 CORAM : MOHIT S. SHAH, C.J. AND SUNIL P.DESHMUKH, J. DATE : 28 th AUGUST 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.) **Judgment circulated on page 145 of 2013 NUTA Bulletin.**

**(4) W.P. No. 4994 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 4994 OF 2013 [CORAM : R . M. BORDE AND SUNIL P.DESHMUKH, J.J.] DATE : 13 th SEPTEMBER 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.): **Judgment circulated on page 205 of 2013 NUTA Bulletin.**

**(5) W.P. No. 6659 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.6659 OF 2013 Dr.Uttam Pralhadrao Dolhare and Ors... Petitioners VERSUS The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. and Ors....Respondents CORAM : R.M.BORDE & SUNIL P.DESHMUKH, JJ. DATE :10th October, 2013. ORAL JUDGMENT (Per Sunil P. Deshmukh, J.) **Judgment circulated on page 216 of 2013 NUTA Bulletin.**

**(6) W.P. No. 3122 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELATE JURISDICTION WRIT PETITION NO.3122 OF 2013 Smt.Kamble Manisha Navanath ...Petitioner VERSUS The State of Maharashtra through Principal Secretary Department of Higher and Technical Education & Ors. ...Respondents CORAM A.S.OKA, & REVATI MOHITE DERE,JJ. DATE : SEPTEMBER 26,2013 **Judgment circulated on page 218 of 2013 NUTA Bulletin.**

**(7) W.P. No. 10149 OF 2010 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY,BENCH AT AURANGABAD. WRIT PETITION NO. 10149 OF 2010 Dr. Mahesh S/o Prabhakar Kulthe & Ors... PETITIONERS VERSUS The Union of India through The Secretary in the Department of Human Resources Development Shastri Bhavan, New Delhi & Ors ...RESPONDENTS CORAM R. M. BORDE AND SUNIL P. DESHMUKH, JJ. OCTOBER 17, 2013 Judgment (Per: Sunil P. Deshmukh, J.) **Judgment circulated on page 234 of 2013 NUTA Bulletin.**

१३.४ सर्व बांजूचे म्हणणे ऐकून घेतल्यावर मा. उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे आपले निरीक्षण नमूद केले. "We have considered the contentions canvassed by the learned Counsel for the parties. In the backdrop of the above referred facts, it is apparent that though the University Grants Commission vide notification dated 5/11/2008 exempted Lecturers from clearing NET/SET examination, however, only because the date from which such exemption would come into effect was not communicated/declared by the University Grants Commission, the claims of the petitioners for grant of senior grade pay scale as per Career Advancement Scheme could not be finalized by the State Government. **The State Government is ready and willing to consider the claims of the petitioners for grant of benefits under Career Advancement Scheme provided University Grants Commission communicates the date from which exemption granted vide notification dated 5/11/2008 becomes effective.** It is also brought to the notice of this Court that the State Government has already made a request to the University Grants Commission in this regard."

१३.५ शेवटी मा. उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे आदेश पारित केले. "In the above background, **We direct the respondent no.5 University Grants Commission to communicate to the State Government the date when such exemption became effective as per notification dated 5/11/2008 in respect of the petitioners, within a period of three weeks** from the date of communication of this order. **We direct the State Government to reconsider the claims of the petitioners on receipt of communication from the University Grants Commission in respect of effective date of exemption,** in accordance with law and procedure applicable in this regard at the earliest. With these observations and directions, the petition is disposed of."

१३.६ मला येथे हेही नमूद केले पाहिजे की सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये हा निर्णय मिळाला हे खरे असले तरी चंद्रपूर येथील नेट-सेट मुक्त अनेक प्राध्यापकांनी एकूणच या कामी मोठी धडपड केली. याचिका क्रमांक ४९०९ च्या सोबत सन २०१० ची याचिका क्रमांक ४९०८ व ४८९१ अशा आणखी दोन याचिका चंद्रपूर येथील नेट-सेट मुक्त शिक्षकांनी दाखल केल्या होत्या व त्या प्रत्येक याचिकेत अनेक नेट-सेटमुक्त शिक्षक सहभागी होते. **मा. उच्च न्यायालयाचा उपरोक्त निर्णय स्वतंत्रपणे व एकसारखाच या तिनही प्रकरणामध्ये २० एप्रिल २०११ रोजी झालेला आहे.**

१३.७ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ७ ऑगस्ट २०११ रोजीच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ८ जुलै २०११ रोजीच्या निर्णयामध्ये कोणत्या तारखेपासून त्या प्रत्येक शिक्षकांची सेवा धरली जाईल याबाबतचा स्पष्ट उल्लेख नव्हता ही गोष्ट लक्षात आल्यामुळे केलेल्या ठरावात महासंघाने अशी मागणी केली होती की, "त्या प्रत्येक नेमणूकीला मान्यता देण्याची केलेली प्रत्येक विनंती (Representation) विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्य केलेली असतांना "हा निर्णय महाराष्ट्र शासनाला व विद्यापीठांना कळवितांना कोणतीही गोष्ट मोघमपणे कळवून चालणार नाही. या निर्णयामध्ये अंतर्भूत असलेल्या "प्रत्येक शिक्षकाची सेवा स्थान निश्चितीच्या प्रयोजनासाठी कोणत्या दिनांकापासून धरावी?" या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला कळविले पाहिजे अशी मागणी करण्यात येत आहे **कारण तसे मा. उच्च न्यायालयाचे आदेशच आहेत** व या प्रश्नाचे स्पष्ट व कायदेशीर उत्तर "**नेमणूकीच्या दिनांकापासून**" असेच आहे कारण तसे मा. सर्वोच्च न्यायालयाचेच आदेश आहेत, अतएव तसे तातडीने कळविले जावे अशी विनंती करण्यात येत आहे." या ठरावातील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबतचा उल्लेख चंद्रपूरकर मंडळींनी मा. उच्च न्यायालयातून मिळविलेल्या सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ (व सोबतच्या इतर दोन सहयाचिका) मध्ये २० एप्रिल २०११ रोजी झालेल्या निर्णयाबाबतचा होता. या तीनही प्रकरणामध्ये सहभागी असलेल्या चंद्रपूर येथील नेट-सेट मुक्त प्राध्यापकांना हा जो मा. उच्च न्यायालयाचा निर्णय मिळाला त्यामुळे महाराष्ट्रातील जवळ जवळ १० हजार नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत वेगवेगळ्या तारखा नमूद करण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा मार्ग

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

## CIVIL APPELATE JURISDICTION : WRIT PETITION NO.3122 OF 2013

Smt.Kamble Manisha Navanath ...*Petitioner* **VERSUS** The State of Maharashtra through Principal Secretary Department of Higher and Technical Education & Ors. ...*Respondents*

Mr.C.R.Sadashivan a/w Mr.M.M.Ganguli for the Petitioner : Ms S.S.Bhende, AGP for the respondent Nos.1 and 2

## CORAM : A.S.OKA, & REVATI MOHITE DERE,JJ.

## DATE : SEPTEMBER 26,2013

**P.C.:** 1 Heard the learned counsel for the petitioner and the learned AGP for respondent Nos.1 and 2. **The petitioner is the widow of one Navnath Bhairu Kamble.** The said Navnath was appointed on 16th October 1995 to the post of Lecturer in English in Sangola College at Sangola. The employment of the petitioner was terminated by the College.

2 **Being aggrieved by the said order, the petitioner's husband preferred an appeal before the College Tribunal. The College Tribunal allowed the appeal by order dated 24th October 2000 and directed reinstatement of the petitioner with backwages and other consequential benefits.** It appears that Sangola Taluka Ucchha Shikshan Mandal which is running the college filed Writ Petition No.182 of 2011 for challenging the order of the College Tribunal. On 23rd January 2001, **the writ petition was rejected at admission stage.**

3 **On 13th November 2005, the petitioner's husband passed away.** For releasing the amount of provident fund plus pension, on 29th March 2005 the Principal informed the petitioner to produce Succession Certificate. **Accordingly, on 12th February 2009, the petitioner produced Succession Certificate issued by the Competent Civil Court.** It appears that the pension papers of the petitioner's husband were forwarded by the College to the Government on 20th July 2011. The Accounts Officer, Higher Education, Kolhapur issued a communication to the petitioner that the documents show that the appointment of her husband was on adhoc basis and therefore, theAccountant General has suggested that the opinion of the State Government should be sought. Accordingly, it is stated that the Divisional Joint Director, Higher Education, Kolhapur has sought guidance from the State Government and after receiving the same, necessary action will be taken on the pension proposal of the petitioner.

**4 After having heard the learned counsel for the petitioner and the learned AGP for respondent Nos.1 and 2, we find that the appointment of the petitioner's husband was a permanent appointment.** It will be necessary to make a reference to the findings of the learned Presiding Officer of the College Tribunal in Judgment and Order dated 24th October 2000 which is directed against the order of termination of the petitioner's husband. The Joint Director of Higher Education was a party to the said appeal who contested the appeal by filing a written statement. The appeal was also opposed by the Management of the College. Paragraph 10 of the Judgment shows that the **Joint Director filed a written statement and contended that approval has been granted to the appointment of the petitioner's husband on probation by the University subject to condition of the petitioner's husband passing NET/ SET examination. It was contended that the petitioner's husband can't claim his appointment as a regular appointment.** In paragraph 3 of the **Judgment of the Tribunal it is held that after publishing proper advertisement, duly constituted Selection Committee conducted the interviews. The appointment was made by the duly constituted Selection Committee.** In paragraph 5 of the Judgment, a categorical finding has been recorded which reads thus:

"5 In the result, for the foregoing reasons, <u>I find that the Appellant has become permanent teacher on SC post on 15.11.97 and his services cannot be terminated.</u> Therefore, I find that the order of reduction dated 30.9.97 and the order of termination dated 19.3.98 terminating the services of Appellant w.e.f 22.4.98 are not legal, valid, proper and correct. Therefore, this appeal will have to be allowed and both the orders will have to be set aside...." (underline supplied)

5 It will also material to note the declaration granted by the Tribunal which reads thus:

"<u>It is declared that the Appellant is in continuous service on full time post of teacher in the subject English from 15.11.95 and the Appellant is permanent and confirmed full time teacher</u> in the college of Respondent Nos.1 and 2 and he is entitled to all benefits of permanent teacher. The Respondent Nos.1 and 2 are directed to reinstate the Appellant on full time post of lecturer in English w.e.f 1.10.97 and to pay him arrears of salary from 1.10.97 till the date of reinstatement. This order is to be complied within a fortnight after expiry of 2 months from today i.e 24.10.2000." (underline added)

6 Thus, there is a categorical finding recorded by the Tribunal that the petitioner's husband was in continuous service on full time post of teacher of English subject from 15.11.1995. **A specific declaration is made that he was permanent and confirmed full time teacher and that he was entitled to all benefits as a permanent teacher.** We must note here that not only the Joint Director of Education but the Registrar of Shivaji University as well as the Principal of the College and the Management were parties to the appeal. **The order of the Tribunal has attained finality. Therefore, the order binds all concerned parties.**

7 We may note here that the petitioner's husband filed a Contempt Petition No.188 of 2001 in this Court alleging breach of the order of the College Tribunal. The Joint Director of Higher Education filed an affidavit dated 21st June 2007 in the said petition, a copy of which has been annexed at ExhibitD to the petition. **In paragraph 2 of the affidavit, it is stated that the Joint Director of Higher Education has disbursed the amount of backwages in the sum of Rs.5,20,086/. In fact, he tendered an apology** for the delay in disbursement of the backwages. Even in this affidavit, the Joint Director has not taken a stand that the appointment of the petitioner's husband was on adhoc basis. **The affidavit in the Contempt Petition has been filed on behalf of the State Government.**

**8 Therefore, the contention raised in the communication dated 20th June 2011 that the appointment of the petitioner's husband appears to be on adhoc basis is baseless.** The appointment of the petitioner's husband cannot be treated as on adhoc basis and his appointment was permanent appointment on full time post as declared by the College Tribunal.

9 **We are, therefore, of the view that the pension proposal of the petitioner's husband cannot be kept pending on the footing that the appointment of the petitioner was on adhoc basis.** While deciding the pension proposal, the State is bound by the order of the College Tribunal to which we have made reference in the earlier part of this Judgment and order.

10 We accordingly dispose of the petition by passing the following order:

(i)We direct the respondent Nos.1 and 2 to take appropriate decision on the proposal for the payment of all benefits such as gratuity and pension to the petitioner within a period of six weeks from today;

(ii)Appropriate decision shall be taken in the light of the observations made in this Judgment and order;

(iii)We make it clear that while considering the proposals submitted, **the State Government will have to proceed on the footing that the appointment of the petitioner's husband with effect from 15th November 1995 as a full time teacher in English subject was a permanent and confirmed appointment;**

(iv) All concerned to act upon an authenticated copy of this order.

(REVATI MOHITE DERE,J.) (A.S.OKA,J.)

कायमचा बंद झाला. नेट-सेट मुक्तता प्रदान केलेल्या प्रत्येक शिक्षकाबाबत वेगवेगळ्या तारखा वेगवेगळ्या पत्रावर नमूद करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाला मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे सर्व प्रकरणी एकच अशी धोरणात्मक तारीख ठरविण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्यावेळेला महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने कायदेशीर मुद्यांचा ठराव करून व तपशीलवार निवेदन देऊन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे प्रत्येक शिक्षकांच्या बाबतीत ही तारीख म्हणजे नेमणूकीची तारीखच असू शकते असा कायदेशीर आग्रह धरल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत विधी सल्लागारांचे मत घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने १६ ऑगस्ट व २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये कळविलेले निर्णय घेतले. **या सबंध प्रकरणात उपरोक्त अनेक नेट-सेटमुक्त प्राध्यापकांनी, त्यांच्या संघटनांनी व शिखरस्थ महासंघाने केलेली उपरोक्त मेहनत व घेतलेले कष्ट ज्यांना माहित नाही अशा "गुणवंत प्राध्यापकांना" त्यामुळेच यामध्ये गौप्यस्फोट दिसतो.**

**१३.८** प्रा.टिकाराम देवाजी कोसे यांचा मुद्दाम नावानिशी उल्लेख करावयाचा तो यासाठी की त्यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा त्यानंतरही अखंडपणे सुरू ठेवला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा ऑगस्ट २०११ मध्ये ठराव झाल्यानंतर माहितीच्या अधिकारामध्ये प्रा. कोसे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सतत पाठपुरावा केला व त्याबाबतची माहिती अधिकृतपणे प्राप्त करून घेतली. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे माहितीच्या अधिकारामध्ये "Shri. Tikaram Dewaji Kose, F1 Aditya Appt. Near Prathmesh Enclave Giridwara Road, Shastrinagar, Chandrapur (MS) - 442 401" यांना विद्यापीठ अनुदान आयोगाचे "A.K. Dogra, Financial Advisor, 1st Appellate Authority" यांनी अधिकृत माहिती पुरविली असून गुणवंत प्राध्यापकांच्या माहितीसाठी हे मुद्दाम नमूद करण्यात येत आहे की **प्रा.कोसे यांना आलेले हे पत्र विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लेटर हेडवर असून त्यावर पत्र पाठविणाराची पूर्ण स्वाक्षरी आहे.**

**१३.९** विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रा. टिकाराम कोसे यांना लेटर हेडवर पाठविलेल्या या पत्रासोबत एकूण चार पृष्ठे जोडलेली आहेत. त्यातील पहिल्या दोन पृष्ठांवर विद्यापीठ अनुदान आयोगाची एक नोटशीट सोबत असून या नोटशीटच्या पहिल्या पानावर अर्ध्या भागात ३ परिच्छेद संगणकमुद्रित आहेत. या नोटशीटचा क्रमांक व त्यातील पहिला परिच्छेद शब्दशः पुढील प्रमाणे आहे. :-

"UGC, New Delhi : F.NO.10-6/2011(PS/Misc.)
S.No.1 (FR)p.1-6/c

A copy of the judgment passed by the Hon'ble High Court of Judicature at Bombay, Nagpur Bench, Nagpur in respect of the writ petition No. *4909/* 2010 filed by Shri Tikaram Dewaji Kose & others Versus the State of Maharashtra & others has been received in this section from Legal cell on 19.08.2011, when Shri Tikaram Dewajl Kose has sought information under the RTI Act-2005."

२६ ऑगस्ट २०११ चे विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सरकार्यवाहाना पाठविलेले दोन पानांचे मूळ पत्र पृष्ठ ३ व ४ वर असून नोटशीटच्या दुसऱ्या व तिसऱ्या परिच्छेदामध्ये त्या पत्राला व त्या पत्रातील मजकुराला मान्यता होण्याविषयीचा मजकूर लिहिला आहे. या चार पृष्ठापैकी पहिल्या पृष्ठावर ही ३ परिच्छेदाची नोट असून पहिल्या पृष्ठावरील खालील भागात व दुसऱ्या पृष्ठावर विद्यापीठ अनुदान आयोगातील खालपासून तर वर अध्यक्षापर्यंत सर्व अधिकाऱ्यांनी हस्ताक्षरात मारलेले शेरे आहेत. सारे शेरे, ताशेरे हस्ताक्षरात असल्यामुळे सर्व अक्षरे लागतात असे नाही. पण त्यातील ओळखू येतो असा काही मजकूर पुढील प्रमाणे :- "As proposed above" "For approval please" "Where is the file of RTI" "From previous page" "As discussed" "A copy of the said letter is placed below" "For approval as at A A on prepage" This is "As per the decision of the commission" हे त्या दोन पानावरील हस्ताक्षरातील ओळखू येणारे काही शेरे आहेत. तारीख कळविण्याचे मा. उच्च न्यायालयाचेच आदेश असल्यामुळे प्रतिकूल त्यात कोणी लिहिल्याचे दिसून येत नाही.

**१३.१०** पहिल्या व दुसऱ्या पृष्ठावर ही नोटशीट आहे. तिसऱ्या व चौथ्या पृष्ठावर २६ ऑगस्ट २०११ चे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सरकार्यवाहांना पाठविलेले पत्र आहे. प्रा. टिकाराम कोसे यांना पाठविलेले पत्र विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लेटर हेडवर असून त्या पत्रावर श्री. अे.के.डोग्रा यांची त्यांच्या पदनामासहित स्वाक्षरी आहे. सोबत पाठविलेल्या चार पृष्ठांपैकी प्रत्येक पृष्ठावर B.K.Singh या उपसचिवांची प्रमाणित केल्याप्रित्यर्थ पूर्ण स्वाक्षरी आहे व त्या प्रत्येक पृष्ठावरील पूर्ण स्वाक्षरीच्या खाली "B.K.SINGH, Deputy Secretary University Grants Commission, Bahadur shah Zafar Marg New Delhi-110 002" असा शिक्का आहे. सारांश काय तर २६ ऑगस्ट २०११ रोजी आयोगाने महासंघाच्या सरकार्यवाह यांना पाठविलेले जे पत्र सर्व महाराष्ट्रभर उपलब्ध आहे ते व तसेच ते प्रा.टिकाराम कोसे यांनाही पाठविण्यात आले आहे. मात्र प्रा. श्री. कोसे यांच्याकडे असलेल्या त्याच पत्राच्या दोनही पृष्ठावर प्रमाणित केल्याबद्दल बी.के.सिंग यांची पूर्ण स्वाक्षरी असून त्या प्रत्येक स्वाक्षरीखाली त्यांच्या नामाचा व पदनामाचा शिक्का मारलेला आहे.

**१३.११** १६ ऑगस्ट २०११ व २६ ऑगस्ट २०११ च्या पत्राविषयी लिहितांना "प्राध्यापक संघटनेला युजीसीकडून मिळालेली दोन्ही पत्रे ही बी.के.सिंग यांनी काढली आहेत. मात्र दोन्ही पत्रावर सिंग यांची स्वाक्षरी वेगळी दिसत आहे." अशी पुडी सोडणाऱ्या गुणवंत प्राध्यापकांनी हे लक्षात ठेवावे की प्रा. टिकाराम कोसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी नागपूर खंडपीठासमोर दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी पुन्हा याचिका दाखल केली असून सन २०१३ ची ही याचिका क्रमांक ५०२५ होय. त्या याचिकेसोबत २६ ऑगस्ट २०११ चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे पत्र सहपत्र 'एच' म्हणून जोडले आहे व ते या याचिकेच्या पेपरबुकात पृष्ठ ९३ व ९४ वर समाविष्ट आहे. पुड्या सोडणाऱ्या गुणवंतांनी थोडी तसदी घेतली तर या दोन पृष्ठावर त्यांना ते मूळ पत्र जसेच्या तसे दिसेल पण त्यातील प्रत्येक पानावर प्रमाणित केल्याबद्दल बी.के.सिंग यांची पूर्ण स्वाक्षरी व त्याखाली नामाचा व पदनामाचा शिक्का मारलेला दिसेल. या पत्राचे असे दर्शन फक्त या पृष्ठ ९३ व ९४ वरच होईल. त्या दर्शनाने गुणवंत प्राध्यापकांचा संशय फिटेल व समजा नाही फिटला तर गुणवंत प्राध्यापकांना "ते पत्र लेटरहेडवर नाही" असे शपथपत्र तरी निदान दाखल करता येईल.

**१३.१२** गुणवंत प्राध्यापकांचा संशय फिटावा म्हणून २६ ऑगस्ट २०११ च्या पत्राविषयी आणखी एक माहिती नमूद करणे आवश्यक आहे. २८ ऑगस्ट २०१३ रोजी मा. औरंगाबाद खंडपीठासमोर सन २०१३ च्या याचिका

**SUPREME COURT OF INDIA**

COURTNIC

**DEFECTIVE**

Status of : Diary Number 32239 OF 2013

Date of Filing : 07/10/2013

STATE OF MAHARASHTRA & ORS. .
***VERSUS***
ASHA RAMDAS BIDKAR & ORS/

Filed By : MS. ASHA GOPALAN NAIR

State : Bombay
Section : IX

Agency
HIGH COURT OF BOMBAY AT AURANGABAD

**FOLLOWING ARE THE DEFECTS : 1.** AN AFFIDAVIT OF THE PETITIONER IN SUPPORT OF THE PETITION/APPEAL/APPLICATION HAS NOT BEEN FILED, PROPERLY ATTESTED AND IDENTIFIED.

**NIC**

# १ जानेवारी २००६ नंतर पण २१ ऑगस्ट २००९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांसाठी : ४

एक जानेवारी २००६ नंतर पण २१ ऑगस्ट २००९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना सेवानिवृत्ती समयी अदा करावयाच्या ग्रॅच्युईटी संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३० जानेवारी २०१३ रोजी दिलेल्या निर्णयासंदर्भात शनिवार, दिनांक ३ ऑगस्ट २०१३ रोजी शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती येथे दुपारी ४.०० वाजता झालेल्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे (१) नागपूर सहसंचालकांच्या क्षेत्रातील ३२ प्राध्यापकांच्या वतीने एक व (२) अमरावती सहसंचालकांच्या क्षेत्रातील ८१ प्राध्यापकांच्या वतीने दुसरी अशा दोन याचिका मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल करण्यात आलेल्या आहेत.

७. सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर यांच्या क्षेत्रातील शिक्षकांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेचे तपशील (Case Details) पुढील प्रमाणे आहेत. :-

**W.P. No. 5807 OF 2013 :- Case Details** (2) Bench:- Nagpur (3) Stamp No.:- WPST/17353/2013 (4) Filing Date:- 26/09/2013 (5) Reg. No.:- WP/5807/2013 (6) Reg. Date:- 23/10/2013 (8) Petitioner:-Arvind Bhagwant Surdas And others (9) Respondent:- The State of Maharashtra and others (10) Petn.Adv.:- Firdos Mirza (11) Resp.Adv.:- Copy Served to G.P. / R-1 to 4 (12) Bench:- DIVISION (13) Status:- Pre- Admission (14) Category:- WRIT PETITION (15) Last Date:- 24/10/2013 (16) Stage:- PETITIONS FOR ADMISSION - FRESH [CIVIL SIDE MATTERS] (17) Last Coram:- HON BLE SHRI JUSTICE B.R. GAVAI HON BLE SHRI JUSTICE Z.A. HAQ (18) Act :- Constitution Matter **(19) Next date for final dsposal is 21st November.**

८. सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्या क्षेत्रातील शिक्षकांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेचे तपशील (Case Details) पुढील प्रमाणे आहेत. :-

**W.P. No. 5811 OF 2013 :- Case Details** (1) Bench:- Nagpur (2) Stamp No.:- WPST/17351/2013 (3) Filing Date:- 26/09/2013 (4) Reg. No.:- WP/5811/2013 (5) Reg. Date:- 23/10/2013 (6) Petitioner:- P. M. Kale and Others (7) Respondent:- The State of Maharashtra and others (8) Petn.Adv.:- Firdos Mirza (9) Resp.Adv.:- Copy Served to G.P. / R-1 to 4 (9) Bench:- DIVISION (10) Status:- Pre-Admission (11) Category:- WRIT PETITION (12) Last Date:- 24/10/2013 (13) Stage:- PETITIONS FOR ADMISSION - FRESH [CIVIL SIDE MATTERS] (14) Last Coram:- HON BLE SHRI JUSTICE B.R. GAVAI HON BLE SHRI JUSTICE Z.A. HAQ (15) Act :- Constitution Matter **(16) Next date for final dsposal is 21st November.**

९. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (SUTA) यांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेचे तपशील (Case Details) पुढील प्रमाणे आहेत.:-

**W.P. No. 6369 OF 2013 :- Case Details** (2) Bench:- Bombay (3) Presentation Date:- 19/06/2013 (4) Stamp No.:- WPST/16650/2013 (5) Filing Date:-19/06/2013 (6) Reg. No.:- WP/6369/2013 (7) Reg. Date:- 18/07/2013 (8) Petitioner:- SHIVAJI NIVERSITY TEACHERS ASSOCIATION (9) Respondent :- THE STATE OF MAHARASHTRA and others (10) Petn.Adv.:- C.G.Gavnekar (11) Resp.Adv.:- Government Pleader (12)Bench:-DIVISION (13) Status:- Disposed (14) Disp. Date:- 03/09/2013 (15) Disp.Type:- Disposed Off (16) Disp.By:- HON BLE SHRI JUSTICE A.S. OKA & HON BLE SMT. JUSTICE R.P. MOHITE-DERE (17) Next Date:- 03/12/2013 (18) Stage:- FOR DIRECTION (19) Coram:-HON BLE SHRI JUSTICE A.S. OKA & HON BLE SMT. JUSTICE R.P. MOHITE-DERE (20) Last Date:- 14/10/2013 (21) Stage:-FOR DIRECTION (22) Last Coram:- HON BLE SHRI JUSTICE A.S. OKA HON BLE SMT. JUSTICE R.P. MOHITE-DERE (23) Act :- Mah. Civil Services Pension Rules **(24) Judgment circulated on page 210 of 2013 NUTA Bulletin.**

१०. शिवाजी विद्यापीठ शिक्षक (SUTA) संघातर्फे दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. खंडपीठाने दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी जो निर्णय दिला त्यामध्ये "**(iii)** We direct the State Government to take a policy decision on the basis of the order of the Apex Court dated 30th January, 2013, within a period of four weeks from today ; **(iv)** Though we have disposed the above petition with the aforesaid directions, for reporting compliance, the petition shall be placed on the Daily Board on 14th October, 2013 under the caption of Directions" असे आदेश नमुद आहेत.

११. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १४ ऑक्टोबर २०१३ रोजी ही याचिका त्याच खंडपीठाच्या बोर्डावर पुन्हा 'डायरेक्शन' या सदराखाली सुनावणीस आली. त्या दिवशी न्यायालयात घडलेल्या घडामोडीचा अधिकृत वृत्तांन्त पुढील प्रमाणे :-

**"IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**CIVIL APPELLATE JURISDICTION**
**WRIT PETITION NO.6369 OF 2013**

Mr.G.S.Hiranandani i/b.Mr.C.G.Gavnekar, for the petitioner.
Ms.S.S.Bhende, AGP for respondent nos.1 and 2.

**CORAM: A.S.OKA & REVATI MOHITE DERE, JJ.**
**DATED: 14th OCTOBER, 2013**

**P.C.:-** 1. Learned AGP on instructions states that the State has applied for review of the Judgment and Order dated 30th January, 2013 passed by the Apex Court on the basis of which this Court has issued directions.

2. In view of this statement, we direct that this Petition shall be listed on 3rd December, 2013 under the caption of Directions .

**(REVATI MOHITE DERE, J.) (A.S.OKA. J.)**"

.............

१२. उपरोक्त परिच्छेद ७ ते ११ सर्वांच्या माहितीकरिता प्रसृत करण्यात आलेले आहेत.

**डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष, ( NUTA ) **डॉ. अनिल ढगे**, सचिव,
**प्रा. एम.टी.देशमुख**,संघटक

PR : (1) P 93-95 NB 2013 (2) P 149 NB 2013 (3) P 210 NB 2013 (3) P 220 NB 2013

**टिप** :- मा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य सरकारने दाखल केलेली पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे, अशा बातम्या काही वृत्तपत्रातून गेल्या आठवड्यात आलेल्या आहेत. "असोसिएशन फॉर कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अॅन्युएटेड टिचर्स" या संघटनेने मुळात सर्वोच्च न्यायालयातील याबाबतची सर्व खटपट केलेली होती. त्या संघटनेचे अध्यक्ष डॉ. एम.ए.वाहूळ यांनी "**मंत्रालयात काम करणारे काही अधिकारी राज्य घटनेतील तरतुदी पाळत नाहीत, शिवाय नियमांचे पालनही करत नाहीत. त्यामुळे सर्वसामान्यांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. या निर्णयाने जर राज्य सरकारचे डोळे उघडले असतील तर त्यांनी अधिकाऱ्यांना नियम पाळण्याच्या सुचना द्याव्यात**" असे वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले. "त्यांच्या संघटनेने दाखल केलेल्या अवमानना याचिकेची सुणावणी १५ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात होणार आहे." अशी माहिती त्यांनी दिली आहे. - **संपादक**

क्रमांक ५२७१ मध्ये (इतर सहयाचिका सोबत) मा. खंडपीठाचा निर्णय झाला. त्यामध्ये राज्यशासन व विद्यापीठ अनुदान आयोग हे दोघेही प्रतिवादी होते. त्या निर्णयाच्या परिच्छेद १८ मध्ये मा. उच्च न्यायालयाचे पुढील निदेश आहेत. "It is also not in dispute that the UGC has resolved to grant exemption to the teachers who were appointed during 1991 to 2000 and has also stated that "Therefore, the services of such teachers, for all purpose, should be counted from the date of their regular appointment" Vide communication of UGC dated 26.08.2011" ऑगस्ट २०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे हे ठाऊक असतांना ऑक्टोबर २०१३ मध्ये "ही स्वाक्षरी वेगळी दिसते" अशी वळवळ काही गुणवंतांनी सुरू केल्यामुळे अगोदरच "गुणवंत प्राध्यापक" संख्येने कमी असतांना विनाकारणच अगुणवंत प्राध्यापकांच्या संख्येमध्ये काहीनी वाढ केल्याचे पुण्य या काही गुणवंतांच्या पदरी पडते, हे त्यांच्या लक्षात येत नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे.

**१३.१३** आता प्रा. टिकाराम कोसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकांचा विषय निघालेलाच आहे तर आणखी एक महत्वाची गोष्ट येथे नमूद करणे मला आवश्यक वाटते. सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये राज्यशासनाच्या वतीने दिनांक २९ मार्च २०११ रोजी १० परिच्छेदांचे एक शपथपत्र दाखल करण्यात आले होते. कोणत्या तारखेपासून नेट-सेट मुक्तता लागू होते याची तारीख जर विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला कळविली तर या शिक्षकांना स्थाननिश्चितीचे अनुषंगिक लाभ दिले जातील. असे शासनाने प्रतिज्ञेवर या शपथपत्रात नमूद केले होते. ते शब्दश- पुढील प्रमाणे :- "*In the event of supplying the date of exemption if they obtained from the University Grants Commission the consequential benefits* as *per the Career Advancement Scheme could be granted to the petitioners*" एकदा तारीख कळू द्या, राज्य शासन या शिक्षकांना स्थाननिश्चितीचे (CAS) लाभ द्यायला तयार आहे अशी हमी या शपथपत्रात पुढील शब्दात देण्यात आली होती. :- '"*It* is *for the petitioners to provide the date of exemption to the State Government regarding exemption from not qualifying the NET / SET Examination. After receipt of the date* of *exemption from petitioners the State Government can very well grant benefits of Career Advancement Scheme to the petitioners*" राज्य शासनाच्या त्या शपथपत्रात परिच्छेद ९ व १० मध्ये उक्त मजकुर समाविष्ट आहे.

**१३.१४** विधानपरिषदेमध्ये नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत अनेक आश्वासने शासनातर्फे देण्यात आली पण शासनाने त्यांचे पालन केले नाही, सभागृहाच्याबाहेर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला शासनाने अनेक लेखी आश्वासने दिलीत पण त्यांचे पालन झाले नाही, **राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेला लिखित शब्दसुद्धा पाळला गेला नाही, माननीय उच्च न्यायालयासमोर १० मे, २०१३ रोजी दिलेला शब्द सुद्धा शासन पाळत नाही,** आता तर प्रतिज्ञेवर दाखल केलेल्या शपथपत्रात नमूद केलेली कारवाईसुद्धा शासन करीत नसल्यामुळे पुन्हा प्रा. टिकाराम देवाजी कोसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सन २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर पुन्हा १८ परिच्छेदांची सन २०१३ ची याचिका क्रमांक ५०२५ दाखल केलेली आहे. अर्जदारांच्या वतीने त्यांची ही याचिका नागपूरातील **सुप्रसिद्ध विधिज्ञ ॲडव्होकेट फिरदोस मिर्झा यांनी तयार करून मा. नागपूर खंडपीठापुढे दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी सादर केलेली आहे.** या याचिकेच्या परिच्छेद ७ मध्ये या शिक्षकांची ही व्यथा

# सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजना

१. मुंबई उच्च न्यायालयातील मा. मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिनांक १० मे २०१३ रोजी जो निर्णय दिला त्या निर्णयाचा परिच्छेद २ शब्दशः पुढील प्रमाणे आहे :- "(2) So far as the first demand is concerned, Dr. Mukhopadhyay has given the past events. We do not propose to go into the dates and events referred to in the affidavit but we record the statement being made by Mr. Saluja, learned A.G.P. under instructions of Mr. G. S. Rasal, Joint Secretary to the Government of Maharashtra, Higher Education and Technical Education Department, that the arrears of salary on the basis of 6th Pay Commission recommendations have **partly been paid in March 2013 and that the balance amounts will be released by 31 July 2013.**"

२. उत्तरप्रदेश विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघाचे समन्वयक डॉ. हृदयनाथ त्रिपाठी विरुद्ध उत्तर प्रदेश शासन या प्रकरणात (No. 64068 of 2011) एक महत्वपूर्ण निर्णय त्यापूर्वी झालेला आहे. २१ ऑगस्ट २०११ रोजी एक परिपत्रक काढून उत्तर प्रदेश शासनाने **"केंद्राकडून निधी आल्यावर आम्ही थकबाकी देवू"** असे आदेश काढले होते. **उत्तर प्रदेश शासनाचा हा आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला व एकमुस्त थकबाकी देण्याचे पुढील शब्दात आदेशित केले.:-** "In view of the aforesaid facts, we are of the view that the **stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained.** The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC, which admittedly has been accepted by the State Government and thereafter shall apply to the Central Government for reimbursement of the amount so incurred towards the payment of arrears of salary. **For the reasons aforesaid, the impugned order dated 21.8.2011 is liable to be quashed. Accordingly, impugned order dated 21.8.2011 is hereby quashed.** The State Government is directed to release the necessary fund for payment of arrears of salary of teachers of National Post Graduate College, Barhalganj, Gorakhpur within a maximum period of one month, from the date of receipt of certified copy of this order."

३. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने भारतिय संविधानाच्या अनुच्छेद २०५ अन्वये सन २०१३-२०१४ च्या खर्चाचे पुरक विवरणपत्र विधानमंडळास दिनांक १६ जुलै २०१३ रोजी सादर केले. त्यामध्ये बाब क्रमांक २०३ अन्वये राज्य कृषित्तर विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयातील अध्यापकांच्या वेतनश्रेणीच्या १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २०१० या कालावधीसाठीची रुपये १,९१०.८० कोटी इतक्या रकमेची थकबाकी, केंद्र सरकारने आणि राज्य शासनाने अनुक्रमे ८०:२० या प्रमाणात अदा करावयाची आहे, त्यासाठी रुपये ७०९.९३ कोटीची मागणी विधानमंडळाकडे केली होती. ती मागणी विधान मंडळात मंजूर सुद्धा झाली होती.

४. अलाहाबाद उच्च न्यायालयाने याबाबतीत स्पष्टपणे निर्णय दिलेला आहे. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयात फिरवला गेलेला नाही किंवा महाराष्ट्रातील कोणत्याही मा. उच्च न्यायालयाने त्याहून वेगळा निर्णय दिलेला नाही. तो निर्णय मा. उच्च न्यायालयाच्यामार्फत राज्य शासनाच्या लक्षात आणून देण्यात आलेला आहे. वर परिच्छेद एक मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायधिशांच्या खंडपीठासमोर झालेल्या घडामोडी लक्षात घेता शासनाला याबाबतसुद्धा अवमान याचिकेला सामोरे जावे लागेल असे दिसते. महासंघाचे अध्यक्ष प्रा.अे.टी.सानप यांनी पदग्रहण केल्यानंतर लगोलगच संचालक, उच्च शिक्षण यांची त्यांच्या पुणे येथील कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना याबाबतची कल्पना दिली. गेल्या दोनचार दिवसात अडवून ठेवलेला हा निधी सहसंचालक कार्यालयापर्यंत पोचविला असल्याचे सांगण्यात येत आहे. त्या कार्यालयास असलेली 'रिकव्हरीची गोडी' लक्षात घेता या महिना अखेर याबाबत अंतिम कारवाई न झाल्यास संघटनेच्या पातळीवर पुढील कारवाई सुरु करण्याचा विचार अंतिम करण्यात येईल.

**डॉ. प्रविण रघुवंशी, अध्यक्ष 'नुटा'**

पुढील शब्दात मांडण्यात आलेली आहे. :-

"7. That, the respondent State filed their affidavit in reply dated 29.03.2011 in the above W.P. No.4909/2010 admitting the claim of the petitioners but the only reason for not extending the benefits was given that the effective date of exemption is not known to the State. It was further mentioned in the affidavit that, *"In the event of supplying the date of exemption if they obtained from the University Grants Commission the consequential benefits* as *per the Career Advancement Scheme could be granted to the petitioners"* (Para 10). An undertaking was also given in the same affidavit as *"It* is *for the petitioners to provide the date of exemption to the State Government regarding exemption from not qualifying the NET / SET Examination. After receipt of the date* of *exemption from petitioners the State Government can very well grant benefits of Career Advancement Scheme to the petitioners"* (Para 9). Copy of the affidavit in reply of respondent no.3 is annexed herewith and marked as ANNEXURE-F" या आताच्या याचिकेच्या पेपरबुकामध्ये पृष्ठ ८० ते ८७ वर राज्य शासनाने सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये दिनांक २९ मार्च २०११ रोजी दाखल केलेले त्यावेळचे शपथपत्र सहपत्र 'एफ' म्हणून जोडलेले आहे.

**१३.१५** त्यावेळी सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २० एप्रिल २०११ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले होते. "In the above background, We direct the respondent no.5 University Grants Commission to communicate to the State Government the date when such exemption became effective as per notification dated 5/11/2008 in respect of the petitioners, within a period of three weeks from the date of communication of this order. We direct the State Government to reconsider the claims of the petitioners on receipt of communication from the University Grants Commission in respect of effective date of exemption, in accordance with law and procedure applicable in this regard at the earliest"

**१४.** "राज्यातील नेट-सेट न झालेल्या प्राध्यापकांना उच्च न्यायालयाने दिलासा दिला असून त्यांची सेवा नियुक्तीपासून गृहित धरून त्यांना सेवाज्येष्ठतेचे लाभ देण्यात यावेत, त्याचप्रमाणे दरवर्षी सहा टक्के याप्रमाणे नुकसानभरपाई देण्यात यावी, असा निर्णय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने ऑगस्टमध्ये दिला असून महिनाभरात तीन प्रकरणांमध्ये न्यायालयाने हा निकाल कायम ठेवला आहे." अशी बातमी सांगून ताबडतोबच गुणवंत प्राध्यापकांनी "या तीनही प्रकरणामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) आणि मनुष्यबळ विकास मंत्रालय हे मुख्य प्रतिवादी असतानाही त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल झालेले नाही. ज्यांच्याविरूद्ध याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यांनीच कोणतेही म्हणणे मांडलेले नाही." अशी पुडी सोडली आहे. लगेचच "या तिन्ही प्रकरणांत प्रतिवादी असलेल्या राज्यशासनाकडून आवश्यक कागदपत्रेच सादर करण्यात आली नसल्याचे उजेडात आले आहे." अशीही उजेड पाडणारी उपपुडी सोडण्यात आली आहे.

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, NAGPUR WRIT PETITION NO.454 OF 2013

Rajendra Yashwant Narkhede, Aged about 55 years, Occ. Service, r/o. Hill View Apartments2, Paonaskar Layout, Tope Nagar, Amravati 444602. ........ *PETITIONER* // **VERSUS** // **(1)** The State of Maharashtra, through its Principal Secretary, Department of Higher Education, Mantralaya, Mumbai – 32. **(2)** Director of Higher Education, Administrative Building, Shivaji Nagar, Pune. **(3)** Joint Director of Higher Education, Amravati. **(4)** Senior Auditor (Higher Education Grants), Amravati Region, Amravati. **(5)** The Principal, Brijlal Biyani Science College, Dasera Maidan Road, Amravati. ........ *RESPONDENTS*

Mr.Firdos Mirza, Adv. for the Petitioner. : Mr.N.W.Sambre, G.P. for Respondent Nos. 1 to 4.

### CORAM : B. R. GAVAI & Z. A. HAQ, JJ.
### DATE : 19/10/2013.
### *ORAL JUDGMENT* (Per B. R. Gavai, J) :

1. Rule made returnable forthwith. Heard by consent.

2. The petitioner has approached this Court challenging the order dt.17.12.2012 passed by respondent no.3, vide which the petitioner is held to be not entitled to the **pay scale of Rs.14,940/** and recovery of excess payment made to the petitioner is ordered. The impugned order refers to the Government Resolution dt.3.3.2000.

3. The two Division Benches of this Court, to which one of us was a party, in the Judgment and Order passed in Writ Petition No.9054 of 2010, dt.22.8.2011 decided at the Aurangabad Bench and the Judgment and Order passed in Writ Petition No.853 of 2012, dt.29.11.2012 decided at this Bench have considered the similar facts and directed the respondents to fix the petitioners therein in the higher pay scale upon their completion of five year's service as Readers/Selection Grade Lecturers. The aforementioned judgment delivered at this Bench was sought to be reviewed by the State by filing Misc. Civil Application St. No.11599 of 2013. The Division Bench of this Court (aforestated), relying on the judgment of the Apex Court in the case of **Syed Abdul Qadir vs. State of Bihar and Others** reported in 2009 (3) SCC 475 found that there was no merit in the review petition and as such, dismissed the same.

4. In that view of the matter, when it is not disputed that the facts in the present case are identical to the facts in the aforesaid two cases, we are inclined to allow this petition. Hence, the petition is allowed.

The respondents are directed to fix the petitioner herein in the higher pay scale upon his completion of five year's service as a Reader/Selection Grade Lecturer.

Needless to state that the petitioner would be entitled to consequential benefits upon fixation of higher pay scale.

In the facts and circumstances of the case, no order as to costs.

JUDGE JUDGE

** AF : P 81 **

## बेकायदेशिर 'रिकव्हऱ्या' काढण्याच्या 'उद्योगा'ला मा. उच्च न्यायालयाचा तडाखा

**१५.** मा. सर्वोच्च न्यायालयाने " Sharadendu Bhushan, Appellant v. Nagpur University, Nagpur & Ors, Respondents " (AIR 1988, Supreme Court 335) या प्रकरणात **experience is the basis of placement.** " असा निर्णय दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या व त्यानंतरच्या अशा अनेक निर्णयामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाने आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी सेवा केंव्हापासून धरावी याबावत गेल्या अनेक वर्षापासून ठाम भूमिका घेतली आहे. विधीसल्लागारांच्या सल्ल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २५ डिसेंबर १९९८ रोजी एक परिपत्रक काढले होते. (UGC by letter D.O. No.F.2-6/98 (PS) dated 25th December 1998) त्यात पुढील प्रमाणे तरतुद आहे. :- "The commission after seeking legal opinion on clause 1 (e) has decided to include service rendered in adhoc capacity for counting of past service for placement in senior scale/selection grade, provided that three conditions, as mentioned hereunder are fulfiled. **(a)** The adhoc service was of more than one year duration; **(b)** The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee; and **(c)** The incumbent was Selected to the permanent post in continuation to the adhoc service without any break."

**१५.१** आता जुन २०१० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये (Notified under No.F.3-1/2009 dated 30th June 2010) सुद्धा अशीच तरतुद आहे. ती पुढील शब्दात :- "10.0 COUNTING OF PAST SERVICES FOR DIRECT RECRUITMENT AND PROMOTION UNDER CAS:

"10.1 (f) The adhoc or temporary service of more than 1 year duration can be counted provided that **(i)** The period of service was of more than one year duration **(ii)** The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee and **(iii)** The incumbent was selected to the permanent post in continuation to the adhoc or temporary service without any break "

**१६.** विद्यापीठ अनुदान आयोग प्रतिवादी होते व त्यांनी औरंगाबाद खंडपिठासमोर प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही हे गुणवंत प्राध्यापकांचे म्हणणे वस्तुस्तितीवर आधारीत नाही. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की. दिनांक २५ जानेवारी २०१२ रोजी सन २०१० च्या याच याचिका क्रमांक ११४७७ या प्रकरणात मा. न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील व श्री.टी.व्ही.नलावडे यांच्या औरंगाबाद खंडपीठाने सुनावणीच्या वेळी " We have observed that in some of the matters, inspite of issuance of notice the U.G.C. Authorities are not giving instructions to the counsel for filing reply, which causes delay in passing appropriate orders. Learned counsel Shri. Sharma submits that he would again put in efforts to get instructions in the matter. We are therefore, constrained to adjourn the hearing of this petition..... Stand over to 21st February, 2012, in urgent admission category." असे आदेश पारित केले होते. मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी निर्णयीत झालेल्या सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये त्यानंतर १७ फेब्रुवारी २०१२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे श्री.बी.के.सिंग उपसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांनी आयोगाच्या वतीने एकूण २१ परिच्छेदाचे शपथपत्र दाखल केले. या शपथपत्रात १९९१ पासून तर आतापावेतोचा नेटसेट बाबतचा इतिहास तपशीलाने नमूद केलेला आहे. त्या शपथपत्रात नेटसेट प्रभावित शिक्षकांची परिच्छेद १७ (XXXV) मध्ये पुढील प्रमाणे वर्गवारी दिलेली आहे. :- (१) दिनांक १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० (२) ४ एप्रिल २००० नंतर (३) १४ जून २००६ ते ३१ मे २००९ (४) १ जून २००९ नंतर. या प्रत्येक कालखंडात नेटसेट बाबत वेगवेगळी स्थिती होती हे या शपथपत्रात तपशीलाने नमूद केलेले आहे. (Page 74 to 122 of the paperbook)

**१७. ॲडव्हाक सर्व्हिस असली तरी ती स्थाननिश्चितीच्या प्रयोजनासाठी धरली पाहिजे या आपल्या भूमिकेचे ठाम समर्थन आयोगाने या शपथपत्रात केलेले आहे.** ९ ते १४ या परिच्छेदामध्ये ॲडव्हॉक सर्व्हिस धरण्याबाबत आयोगाने वेळोवेळी काढलेली पत्रे, पत्रके व परिपत्रके यांचा तपशीलाने उल्लेख केलेला असून त्या आधारावर आपल्या भूमिकेचे समर्थन केलेले आहे. दिनांक १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालखंडातील महाराष्ट्रातील नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत आयोगाने ८ जुलै २०११ च्या बैठकीत घेतलेला निर्णय परिच्छेद १७ (XXXVI) मध्ये नमूद केलेला असून परिच्छेद १८ मध्ये त्याचे समर्थन केले आहे.

**१८.** "या तिन्ही प्रकरणांत प्रतिवादी असलेल्या राज्यशासनाकडून आवश्यक कागदपत्रेच सादर करण्यात आली नसल्याचे उजेडात आले आहे." गुणवंत प्राध्यापकांनी टाकलेल्या या उजेडावर मात्र प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

(१) नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक २७ जून २०१३ ही तारीख टाकून जो शासननिर्णय निर्गमित केलेला आहे. त्याच्या परिच्छेद १४ मध्ये **"सदर शासन निर्णयातील तरतुदी दिनांक १९.०९.१९९१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही."** असे नमुद केलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८ सप्टेंबर १९९४ रोजी Delhi University V/s Raj Singh (AIR SUPREME COURT 336) या प्रकरणात दिलेल्या निर्णयातच "**सदर शासन निर्णयातील तरतुदी दिनांक १९.०९.१९९१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही.**" या परिच्छेद चौदा मधील शब्दरचनेचा उगम आहे हे सर्वविदित आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद २१ मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे निर्णय आहे. :- "**21. We now turn to analyse the said Regulations,.....** The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations **prospective**.......The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, **recommendatory in character**........The said Regulations do not impinge upon the **power of the University** to select its teachers........**The University's autonomy** is not entrenched upon by the said Regulations." मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय हा एक अत्यंत महत्वाचा दस्तऐवज असून तो शासनातर्फे मा. उच्च न्यायालयात सादर व्हायला हवा होता हे खरेच आहे.

(२) दिनांक २७ जून २०१३ च्या या शासननिर्णयातील परिच्छेद १४ शब्दशः पुढील प्रमाणे आहे. :- "१४. प्रस्तावनेत नमूद केलेली परिस्थिती विचारात घेता विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १९.०९.१९९१ ची

## Nagpur University Teachers' Association

### MEETING NOTICE : 1

**DATED : 15.11.2013**

From :
**Dr. A.W.DHAGE**
Secretary, NUTA Sankalp Sahaniwas,
Khare Town, Dharampeth,
Nagpur-444 010
To,
All the members of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.A.W.DHAGE,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting : 12.00 Noon on Sunday, the 19 th January, 2014***

अधिसूचना राज्यात दि. २३.१०.१९९२ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली, त्यामुळे **सदर शासन निर्णयातील तरतुदी दिनांक १९.०९.१९९१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही.** सबब दि. २३.१०.१९९२ पूर्वी नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १९.०९.१९९१ च्या अधिसूचनेतील अर्हता लागू राहणार नाही." **१९.९.९१ पासून नेटसेट सक्तीने लागू झाले नसून ते २३.१०.९२ पासून सक्तीचे झाले अशी भूमिका आता शासनाने घेतली आहे. मात्र त्यापुढच्या ३५ दिवसात २३.१०.१९९२ च्या त्या शासननिर्णयाचे दुःखद निधन झाले होते ही गोष्ट** राज्य शासनाच्या वतीने उच्च न्यायालयात सादर व्हायला हवी होती हेही खरेच आहे.

(३) दिनांक २३ ऑक्टोबर १९९२ च्या शासन निर्णयास पहिला शासननिर्णय असे म्हटले तर ११ डिसेंबर १९९९ चा शासन निर्णय १२ व्या क्रमांकावर येतो. या काळात शासनाने शासननिर्णय, परिपत्रके, आदेश असे एकूण १२ दस्तऐवज निर्गमित केले. **त्यापैकी एकाही दस्तऐवजांमध्ये "कायद्याच्या अमुक कलमान्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून नेट-सेटची पात्रता सक्तीची करण्यात येत आहे." असा उल्लेख नाही.** ही गोष्ट राज्य शासनाच्या वतीने उच्च न्यायालयात सादर व्हायला हवी होती हेही खरे आहे.

(४) राज्याचे तत्कालीन मा. उच्च शिक्षण मंत्री (जे आज विधानसभेचे अध्यक्ष आहेत) सभागृहात नेट-सेटच्या पात्रतेची अट १९९१ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेली असली तरी ती महाराष्ट्रामध्ये डिसेंबर १९९९ पर्यंत कायद्याने लागू करण्यात आलेली नव्हती **"राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे."** "१९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. **आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत"** असे विधानपरिषदेत दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी सांगीतले. त्या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन महाराष्ट्र विधानपरिषद (कार्यवाही - शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१) कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१ वर समाविष्ट आहे. हा या संदर्भात महत्वाचा दस्तऐवज आहे. तो शासनातर्फे मा. उच्च न्यायालयात सादर व्हायला हवा होता हेही खरेच आहे. शासनाने कोंबडे झाकून ठेवले म्हणजे तांबडे फुटायचे राहत नाही. आज ही अधिकृत प्रतिवेदने मा. उच्च न्यायालयातील अनेक याचिकांमध्ये सहपत्रे म्हणून जोडल्या गेलेली आहेत.

(५) महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे. विद्यापीठ कायदा या नावाचा एक कायदा महाराष्ट्रात अजूनही जिवंत आहे. त्या कायद्याच्या कलम ५१ (८) प्रमाणे प्राध्यापक पदाच्या भरतीसाठीची पात्रता ही परिनियमांनीच (मा. राज्यपालांच्या सम्मतीनंतर) ठरविता येते. नेट-सेटची पात्रता सन २००० च्या सुरुवातीपर्यंत तशी कधीही ठरविण्यात आली नव्हती. विद्यापीठ कायद्याच्या कलम १४ (८) प्रमाणे परिनियमाऐवजी निदेश निर्गमित करण्याचा अधिकार मा. कुलगुरूंना आहे. पण महाराष्ट्रातील एकाही कुलगुरूंनी या काळात असे निदेश निर्गमित केलेले नाहीत. राज्यभरात एकवाक्यता रहावी म्हणून खुद्द राज्यशासनाला याच कायद्याच्या कलम ८ (३) प्रमाणे "प्रमाण संहिता" निर्गमित करण्याचा अधिकार आहे. पण नेटसेटबाबत या काळात हे अधिकारसुद्धा राज्य शासनाने कधीही वापरले नाही. ही कितीही महत्वाची कायदेशीर वस्तुस्थिती असली तरी ती राज्य शासनातर्फे औरंगाबाद खंडपीठासमोर मांडण्यात आली नाही असे आता उजेडात आलेले आहे. अर्थातच शासकीय अधिकाऱ्याकडून तशी अपेक्षा करणे चूक आहे.

**१९.** शेवटी राज्यशासनाची बाजू मांडण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली होती त्यांची दुर्बलता गुणवंत प्राध्यापकांनी समजून घेतली पाहिजे. वर सांगितलेले सर्व मुद्दे कायद्याच्या व न्यायाच्या दृष्टीकोनातून कितीही महत्वाचे असले तरी ते मुद्दे राज्यशासनाची बाजू म्हणून मांडण्याचा या अधिकाऱ्यांना काहीही अधिकार नसतो. या अधिकाऱ्यांनी राज्य शासनाची बाजू मांडली नाही असे म्हणणे बरोबर नाही. "राज्य शासनाची जी बाजू" त्यांना शासनाने उपलब्ध करून दिली होती ती त्यांनी मांडली.

(१) राज्य शासनाचा पहिला सर्वात महत्वाचा भारी मुद्दा कोणता तर "आम्ही १८ ऑक्टोबर २००१ चा शासन निर्णय काढून स्थाननिश्चितीसाठी नेट-सेट सक्तीचे केले होते." आता २००१ मध्ये निघालेला शासन निर्णय १९९४ किंवा १९९५ मध्ये झालेल्या भरतीसाठी कसा लागू होणार? हे या अधिकाऱ्यांना समजत नाही असे नाही पण शासनाची बाजू म्हणून त्यांना शासनाची बाजूच मांडावी लागते. स्वतःलाच जे पटलेले नाही ते न्यायदेवते समोर हे अधिकारी कसे मांडणार? कसेतरी मांडणारच ना?

(२) राज्य शासनाचा दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे या नेटसेटमुक्त प्राध्यापकांची सर्व्हिस "ॲडव्हॉक सर्व्हिस" होती हा आहे. आता या "ॲडव्हॉक" सेवेला धरायचे का धरायचे नाही याला गेल्या २५-३० वर्षाचा इतिहास आहे. स्थाननिश्चितीसाठी तदर्थ सेवा सुद्धा धरली पाहिजे असे मा. सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय आहेत, त्यामुळे ती सेवा धरली पाहिजे अशी एका सुराची व एकाच शब्दरचनेची अनेक पत्रे, परिपत्रके, ज्ञापने, विद्यापीठ अनुदान आयोगाने एका मागून एक गेल्या २० वर्षात काढलेली आहेत. आयोगाचा निर्णय त्यांच्या अनेक वर्षाच्या भूमिकेशी सुसंगत असाच राहणार. तसा निर्णय त्यांनी घेतला तर तो गौप्यस्फोटाचा विषय होत नाही हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की त्यांच्या त्या निर्णयाला न्यायदेवतेसमोर पाठींबा देणे राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांना शक्य होत नाही.

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाने ५.११.२००८ च्या पत्रात एक्झम्शन देतांना कोणत्या तारखेपासून लाभ द्यावेत हे आयोगाने आम्हाला कळविले नाही असा तिसरा मुद्दा शासनाच्या वतीने मांडण्यात आला होता. याबाबत मा. न्यायालयाने १६ ऑगस्ट २०११ रोजी प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना पाठविलेल्या व त्यानंतर त्याच महिन्यात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सरकार्यवाहांना विद्यापीठ अनुदान आयोगाने पाठविलेल्या पत्राचा निर्णयाच्या परिच्छेद १८ मध्ये उल्लेख करून "It is also not in dispute that the UGC has resolved to grant exemption to the teachers who were appointed during 1991 to 2000 and has also stated that *Therefore, the services of such teachers, for all purpose, should be counted from the date of their regular appointment*. (Vide communication of UGC dated 26.08.2011)." असा निर्णय दिलेला आहे.

(४) २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाबाबतचा आणखी एक मुद्दा शासनाच्या वतीने मांडण्यात आला होता. "दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा विनिर्दिष्ट अर्टीच्या अधीन राहून शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे." हे तिऱ्हाईत व्यक्तीलासुद्धा ऐकतांना विचित्र वाटते. नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे स्थाननिश्चिती करतांना नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा धरण्याबाबतचा प्रश्न बाजूला राहीला आणि **"पास्ट सर्व्हिस" धरण्याचा निर्णय करण्यासाठी** काढलेल्या शासननिर्णयाने **"फ्युचर सर्व्हिस"** धरण्याचा निर्धार घोषित केला व त्यामुळेच तो न्यायदेवतेपुढे टिकला नाही.

**२०.** प्राध्यापक पदावरील भरतीसाठीची पात्रता ही शासन निर्णयाने नव्हे तर मा. राज्यपालांच्या संमतीने करण्यात आलेल्या परिनियमांनी ठरते असा कायदा महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षापासून अस्तित्वात होता व आजही आहे. हा मुद्दा बाजूला ठेवला तरी सन १९९१ ते २००० या कालखंडात नेट-सेटची पात्रता सक्तीची करणारा त्याकाळात निर्गमित केलेला एकही शासननिर्णय शासनाला मा. उच्च न्यायालयात दाखल करता आला नाही. याचे मुळ कारण म्हणजे तसा शासननिर्णय अस्तित्वात नाही हेच होय. मा. न्यायालयासमोर १८

प्रा.कांबळे हे नेट-सेट नाहीत म्हणून सहसंचालकांनी शासनाचे मार्गदर्शन मागितले व मार्गदर्शनाच्या नावाखाली कुटुंब निवृत्तीवेतनाचा हा प्रस्ताव 'पाडून' ठेवला. प्रस्ताव पेंडीग ठेवण्याच्या सहसंचालकांच्या या कृतिविरूद्ध श्रीमती मनीषा कांबळे यांनी उच्च न्यायालयात आताची ही याचिका दाखल केली होती. २६ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात पुढील प्रमाणे निर्णय दिला.

We are, therefore, of the view that the pension proposal of the petitioner's husband cannot be kept pending on the footing that the appointment of the petitioner was on adhoc basis.

*( See Para 9 of the High Court Judgement on page 218 of 2013 NUTA Bulletin )*

ऑक्टोबर २००१ चा एक शासननिर्णय पुन्हा पुन्हा शासनातर्फे दाखविला जात आहे. १९९१ ते २००० या काळात झालेल्या भरतीला २००१ चा शासननिर्णय लागू करा असे न्यायालयाला सांगतांना शासनाची चांगलीच फजिती होत आहे. हा १८ ऑक्टोबर २००१ चा शासननिर्णय या प्रकरणामध्ये काही कामाचा नाही व टिकणारा नाही. असे मा. उच्च न्यायालयाचे एकामागून एक निर्णय होत आहेत. परिणामी नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबतच्या शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला उच्च न्यायालयातून एकामागून एक तडाखे बसत आहेत.

**२०.१ नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबत शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा पहिला तडाखा :**

दिनांक १० मे २०१३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. मुख्य न्यायमुर्तीच्या खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक (L) 1326 मध्ये शासनाच्या नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबतच्या विकृत भूमिकेला तडाखा हाणणारा पहिला निर्णय दिला. मा. मुख्य न्यायमूर्ती श्री. मोहित शहा व न्या. एम.एस. संकलेचा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिलेला आहे. (Full text of the judgement is circulated on page 61 of 2013 NUTA Bulletin)

**२०.२** सन १९९१ ते सन २००० या काळातील नेट-सेटमुक्त शिक्षकांना 'एक्झम्शन' देऊन त्यांच्या **सेवा 'नियमित' करण्याबाबतचा शासननिर्णय २ आठवड्यात निर्गमित होईल,** असे सरकारी वकीलांना न्यायालयामध्ये मान्य करावे लागले याची नोंद मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये पुढील शब्दात आहे. :- "(4) As regards the above submission, Mr. Saluja states that the State Government will issue G.R. within two weeks from today **for granting exemption from NET/SET to those teachers who were appointed between 19 September 1991 and 3 April 2000** after following the regular procedure."

**२०.३** मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये सेवा निवृत्ती लाभाविषयी मा. खंडपीठाने आपला निर्णय नोंदविला तो पुढील शब्दात :- "(7) We are of the view that if any such amounts of pension or family pension already been paid to the retired teachers or families of retired teachers, or if the benefits of incentives in the form of increments for a M.Phil and Ph.D. etc. are given to the teachers, **no recovery should be made.**"

**२०.४** कायद्याने विहित केलेली पात्रता धारण करणारा उमेदवार म्हणून निवड समितीमार्फत अधिव्याख्याता म्हणून निवड झाली, अधिव्याख्याता म्हणून १० वर्षाच्या वर सेवा झाली, पुन्हा निवड समितीमार्फत प्राचार्य म्हणून निवड झालेल्या व प्राचार्य पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीची सर्व सेवा धरण्याबाबत शासनाला मान्य करावे लागले. ते मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद १० मध्ये पुढील शब्दात नमुद आहे. :- "(10) Learned A.G.P. also states that there will be no recovery of benefits of the past service of the teachers who have become the Principals of the Colleges."

**२०.५** बारा वर्षापासून तर २० वर्षापर्यंत सेवा झालेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांकडून कोणतीही रिकव्हरी काढली जाणार नाही ही गोष्ट सरकारी वकिलांना मान्य करावी लागली. निर्णयाच्या परिच्छेद ५ मध्ये असलेला याबाबतचा उल्लेख पुढील प्रमाणे :- ".... The Government and the Universities will protect the pay and the pay fixation including increments already paid to the teachers and therefore, there will be no recovery of annual increments which the teachers have already earned. Similarly there will be no recovery of other benefits."

**२०.६** रिकव्हरी काढण्याच्या मुद्याबाबत मा. न्यायमूर्तींनी परिच्छेद ११ मध्ये मा. खंडपीठाचे मतसुद्धा पुढील शब्दात नोंदले आहे. :- "(11) Thus, it appears to be the stand of the State Government that whatever benefits are already given to teachers who have not cleared NET/SET will not be withdrawn from them."

**२१. नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबत शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा दुसरा तडाखा :**

दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये शासनाच्या नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबतच्या विकृत भूमिकेला तडाखा हाणणारा दुसरा निर्णय दिला. विद्यापीठ अनुदान आयोगाने एकदा नेटसेट मुक्तता जाहीर केल्यावर केवळ या शिक्षकांना ॲडव्हाक आहेत म्हणून पदोन्नती नाकारता येणार नाही. शासनाचा हा निर्णय पूर्णपणे अन्यायकारक आहे असा निर्णय या प्रकरणात मा. खंडपीठाने पुढील शब्दात नमूद केला आहे :- "In this situation, the tag of their being adhoc teachers, does not and cannot constitute a ground to deny them the benefit of Career Advancement Scheme, ....... The stand taken by the State is wholly unjust and deserves to be rejected." (Full text of the judgement is circulated on page 114 & 115 of 2013 NUTA Bulletin)

**२१.१** सन १९९१ ते २००० या काळात "भरतीच्या वेळी पूर्ण करण्याची सक्तीची पात्रता" म्हणून कायद्याने नेट-सेटची पात्रता महाराष्ट्रात लागू करण्यात आलेली नव्हती. वृत्तपत्रात जाहिराती दिल्या, विद्यापीठाने ह्या जाहिराती मान्य करून दिल्या होत्या, त्यात नेटसेटची पात्रता सक्तीची नव्हती, निवडसमितीने निवड केली, त्या निवड समितीवर शासनाचे व विद्यापीठांचे प्रतिनिधी होते. झालेल्या निवडीला विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंची कायदेशीर मान्यता मिळाली. ही पूर्णपणे कायदेशीर भरती असल्यामुळे शासनाची मान्यता मिळाली व शासन अनुदानातून त्या प्रत्येकाचे पूर्ण वेतन शासन दरमहा गेली कित्येक वर्षे अदा करीत आहे व आजही तसे अदा करणे सुरुच आहे.

**२१.२** विधानपरिषद सभागृहामध्ये १५-२० वर्षात ३०-३५ वेळा तरी हा प्रश्न चर्चेला आला. ३ ऑगस्ट २००१ रोजी सभागृहात तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री मा.श्री दिलिप वळसे पाटील यांनी स्वतः **"१९९१ मध्ये 'स्टँडर्ड कोड' राजपत्रामध्ये प्रसिद्ध करून नेट-सेटची पात्रता शासनाने सक्तीची केली नाही ही शासनाची चूक झाली"** असे कबूल केले. १९९१ पासून तर १९९९ पर्यंत शासनाने एका मागून एक १२ शासन निर्णय किंवा शासन परिपत्रके काढली. पण त्या प्रत्येक दस्तऐवजात "अर्थपूर्ण वाटाघाटींना वाव" ठेवणाऱ्या अनेक प्रेमाच्या गोष्टी अधिकाऱ्यांनी नमूद केल्यात. पण एकाही आदेशात "नेट-सेट सक्तीचे करण्यात येत आहे" असा उल्लेख नाही. तसा शासनाला कायद्याने अधिकारही नव्हता, त्यामुळेच २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय पुढच्या ३५ दिवसात शासनाला रद्द करावा लागला. मा. राज्यपालांच्या स्वाक्षरीने परिनियम तयार केले जातात. त्या परिनियमांनीच "प्राध्यापक पदाची पात्रता" ठरविली जाते. मा. राज्यपालांनी हे परिनियम सन २००० नंतर लागू केले. मा. राज्यपालांचे ते आदेश मानायला शासन तयार नाही. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशावरून व खुद्द शासनाच्या विनंतीवरून विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबत ३ **एप्रिल २००० ही 'कट ऑफ डेट' ठरवून दिली.** त्या तारखेनंतर नेट-सेट सक्तीचे झाले त्याबाबत कोणताही वाद नाही. कोणाचीही तक्रार नाही.

**२१.३** विद्यापीठ अनुदान आयोगाने १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल

> The State Government will have to proceed on the footing that the appointment of the petitioner's husband with effect from 15th November 1995 as a full time teacher in English subject was a permanent and confirmed appointment;
>
> *( See Para 9 (iii) of the High Court Judgement on page 218 of 2013 NUTA Bulletin )*

२००० या काळात महाराष्ट्रामध्ये भरती झालेल्या शिक्षकांना नेट-सेट पात्रतेपासून मुक्तता दिली. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे "नेट-सेटची पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही" असा १९९४ मध्येच निर्णय दिलेला होता. मा. राज्यपालांनी केलेल्या परिनियमांनी केव्हापासून ती पात्रता सक्तीची केली एवढेसुद्धा पहायला शासन तयार नव्हते. या शिक्षकांनी नेट-सेटची पात्रता आता तरी प्राप्त करायला काय हरकत आहे? असा तगादा शासनाने गेली १५-२० वर्षे चालू ठेवला. "**शिक्षकांच्या सेवेमध्येच नव्हे तर कोणत्याही सेवेमध्ये एकदा जाहीरातीनुसार अर्ज करण्याची शेवटची तारीख निघून गेली म्हणजे पात्रतेच्या अटीमध्ये बदल करता येत नाही**" असे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी एका मागून एक दिलेले अनेक निर्णय आज अस्तित्वात आहेत व त्यानुसार आज याबाबतीत कायद्यातील हा अंतिम शब्द आहे. याउलट या शिक्षकांची बदनामी करण्याची मोठी मोहिम शासनाने हाती घेतली. "हे परीक्षेला का घाबरतात?" "त्यांना नेट-सेटची परीक्षा पास करता येत नाही काय?" "जे स्वतः परीक्षेला घाबरतात ते विद्यार्थ्यांना काय शिकविणार?" अशी मानहानीची मोठी मोहिम शासनाने चालू ठेवली. "नेटसेट पात्रता प्राप्त केल्यास ती पात्रता मिळविली त्या दिवसापासून त्यांची सेवा धरली जाईल" असा एक शासननिर्णयच मधल्या काळात शासनाने निर्गमित केला होता. **कायद्याने नेट-सेट पात्रता आपल्याला लागू नव्हती हे ठाऊक असतांना नेट-सेट पात्रता मिळविली तरी पहिल्या दिवसापासून शासन आपली सेवा धरणार नाही याची जाणीव असल्यामुळे यातील बहुसंख्य शिक्षकांनी नेट-सेटच्या पात्रतेकडे ढूंकुनसुद्धा पहायचे नाही व आपला संघर्ष सुरू ठेवायचा असा निर्णय घेतला.**

**२१.४** नोकरशाहीच्या अर्थपूर्ण बजबजपूरीला व राज्यकर्त्यांच्या तर्कशून्य दडपशाहीला बळी न पडण्याचा निर्धार करून गेली अनेक वर्षे हे शिक्षक व त्यांच्या संघटना संघर्ष करीत आहेत. शासनाने कंबरेचे सोडून डोक्याला बांधल्यामुळे गेल्या काही काळात अनेक प्रकरणे न्यायालयामध्ये दाखल झालेली आहेत, होत आहेत. त्यातील जो निर्णय दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठापुढे लागला. या प्रकरणातील २० शिक्षक १९९३ मध्ये सेवेत भरती झालेले होते, त्यांची सेवा २०१३ पासून धरण्याचा एक शासन निर्णय आता २७ जून २०१३ ला शासनाने काढला "**The stand taken by the State is wholly unjust and deserves to be rejected.**" असा निर्णय देवून ६ टक्के व्याजासह त्यांना थकबाकी अदा करण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या मा. खंडपीठाने या प्रकरणात दिले.

**२१.५ 'एक्झमशन' मिळालेल्या शेकडो शिक्षकांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून प्रत्यक्षात धरण्यात आलेली होती. त्याप्रमाणे त्यांना स्थाननिश्चिती देण्यात आली व आर्थिक लाभ सुद्धा देण्यात आलेले होते.** काही सहसंचालकांनी अशा शिक्षकांची स्थाननिश्चिती रद्द करून त्यांच्यावर 'रिकव्हरी' काढण्याचा बेकायदेशीर प्रयत्न केला असता मा. उच्च न्यायालयाने ते प्रयत्न बेकायदेशीर ठरविले होते व त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये अशा अनेक शिक्षकांना 'एक्झमशन' मिळाल्यानंतर नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून त्यांची सेवा धरून सर्व आर्थिक लाभ त्यांना मिळालेले आहेत व आजही मिळत आहेत. मात्र हा साराच अधिकाऱ्यांच्या लहरीनुसार चालणारा कारभार होता. सहसंचालक व संचालक यांची लहर फिरली व ते काम अमरावती विभागात सहसंचालकांनी बंद पाडले. त्यांनी उच्च शिक्षण संचालकांना दिनांक ४ मे २०१० रोजी लेखी एक तक्रार निवेदन दिले. त्यावर ताबडतोबच संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कुलसचिव, संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती यांना **दिनांक १० मे २०१० रोजी एक पत्र** (क्रमांक युएनआय/२०१०/अवि/विशि(८) ८०६) पाठविले. *"विद्यापीठ अनुदान आयोगाकडून नेट/सेट मधून सूट मिळालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना वरिष्ठ व निवडश्रेणी देणेबाबत विद्यापीठाने आयोजित केलेल्या कमिटीबाबत"* असा त्या पत्राचा विषय असून त्याच्या परिच्छेद ३ मध्ये "विद्यापीठ अनुदान आयोगाकडून आपल्या विद्यापीठातील ज्या अधिव्याख्यात्यांना नेट/सेट मधून सूट दिलेली आहे. अशा अधिव्याख्यात्यांची तदर्थ सेवा वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरल्यास आर्थिक भार पडणार असल्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नियम ८(१) मधील तरतुदीनुसार अशा स्वरुपाची कार्यवाही शासनाच्या मान्यतेनंतर करणे आवश्यक आहे." असे कळविले होते. त्याच पत्राच्या परिच्छेद ४ मध्ये त्यांनी "**त्यामुळे उपरोक्त परिस्थितीत यासंदर्भात शासन आदेश होईपर्यंत नेट/सेट मधून सूट मिळालेल्या अधिव्याख्यात्यांना करिअर अॅडव्हान्समेंट योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी मध्ये स्थाननिश्चिती देणेबाबतचे शिबिर/समितीच्या बैठका आयोजित करू नये**" असे नमूद केले होते. वस्तुतः ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून दिलेले लाभ मा. उच्च न्यायालयाने कायम ठेवले होते. **वेगळ्या शासन निर्णयाची कोणतीही आवश्यकता नव्हती याची माहिती असतांना संचालकांनी हे पत्र काढले.** उपरोक्त पत्राच्या प्रति त्यांनी **विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/कोल्हापूर/जळगांव/नांदेड/औरंगाबाद/नागपूर यांना पाठविल्या होत्या.**

**२१.६** संचालकाचे हे कोलीत हाती मिळाल्याबरोबर औरंगाबादच्या सहसंचालकांनी दिनांक २ सप्टेंबर २०१० च्या पत्रान्वये त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना असे कळविले की, "**त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील १९ अधिव्याख्यात्यांचे तदर्थ सेवा गृहीत धरून वरिष्ठ/निवडश्रेणी साठी वेतन निश्चिती करण्यात आलेली असल्यामुळे सदर वेतन निश्चितीस मान्यता देण्यात येत नाही. प्रस्ताव व मूळसेवापूस्तीका परत करण्यात येत आहे.**" मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी निर्णयीत झालेल्या सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मधील निर्णयानुसार (१) संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी दिनांक १० मे २०१० रोजी अमरावती विद्यापीठाला पाठविलेले पत्र व त्याचबरोबर (२) सहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद, यांनी त्या महाविद्यालयाला पाठविलेले दिनांक २९ सप्टेंबर २०१० रोजीचे पत्र. **ही दोनही पत्रे मा. खंडपीठाने निष्प्रभावित केली असून रद्दबादल ठरविलेली आहेत.** QUASHED AND SET ASIDE

**२२. नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबत शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा तिसरा तडाखा :**

त्यानंतर औरंगाबाद खंडपीठासमोर नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५२७१ मध्ये तिसरा तसाच एक अत्यंत महत्वपूर्ण निर्णय झाला. त्या निर्णयामध्ये "मा. खंडपीठाने असे नमुद केले आहे की, "This Court in its order dated 01.08.2013 has found that benefits of CAS cannot be denied to such teachers by considering them ad hoc appointees....... Under the circumstances Government Resolution dated 18.10.2001 is of little significance and cannot be relied upon or resorted to, to support the impugned actions. Having regard to the aforesaid, the recourse to government resolution dated 18.10.2001 by the concerned authorities, is of no avail to them to justify the impugned orders." *(Full text of the judgement is circulated on page 145 to 149 of 2013 NUTA Bulletin)*

**२२.१** यापूर्वी दिनांक १ ऑगस्ट रोजी मा. औरंगाबाद खंडपीठाने शासनाच्या नेटसेटमुक्त शिक्षकांबाबतच्या विकृत भूमिकेला तडाखा हाणणारा निर्णय दिला होता. आता मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी शासनाच्या भूमिकेला आणखी तडाखा बसला. निरनिराळ्या ९ प्राध्यापकांनी वेगवेगळ्या ९ याचिका सन २०१३ मध्ये औरंगाबाद खंडपीठासमोर दाखल केल्या होत्या. यातील आठ प्राध्यापक हे बसमत, तालुका बसमत, जिल्हा हिंगोली येथील बहिरजी स्मारक महाविद्यालयात कार्यरत आहेत व ९ वे शिक्षक नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या नांदेड येथील महाविद्यालयात कार्यरत आहेत. मुळात हे सर्वच

It appears that in 2000, the State government was directed by UGC to make NET/SLET qualification necessary and thereupon, government resolution had been issued directing termination of services of persons appointed after 11-12-1999.

*( See Para 11 of the High Court Judgement on page 235 of 2013 NUTA Bulletin )*

प्राध्यापक नेट-सेटमुक्त असून त्या सर्वांनी नंतरच्या काळात 'पीएचडी' ही पदवी प्राप्त केलेली आहे.

२२.२ 'पीएचडी' पदवी प्राप्त केल्यानंतर सर्व प्रक्रिया यथोचितरित्या पार पडून नेमणूकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून त्यांना स्थाननिश्चितीचे सर्व आर्थिक लाभ मिळाले व आजही मिळत आहेत. विधानपरिषदेमध्ये नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत अनेक आश्वासने शासनातर्फे देण्यात आली पण शासनाने त्यांचे पालन केले नाही. सभागृहाच्याबाहेर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला शासनाने अनेक लेखी आश्वासने दिलीत पण त्यांचे पालन झाले नाही. **राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेला लिखित शब्दसुद्धा पाळला गेला नाही. आता माननीय उच्च न्यायालयासमोर दिलेला शब्द सुद्धा शासन पाळत नाही, असे लक्षात आल्यावर खुद्द मा. उच्च न्यायालयानेच शासनाच्या या भूमिकेला तडाखा हाणला आहे.** दिनांक १० मे २०१३ रोजी मा. मुख्य न्यायाधीश पीठासीन असलेल्या मुंबई खंडपीठासमोर शासनाच्या वतीने सन १९९१ ते १९९९ या काळात सेवेत आलेल्या नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत "**यातील सर्व शिक्षकांचे वेतन, झालेली वेतननिश्चिती व त्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या वार्षिक वेतनवाढी यांचे संरक्षण केले जाईल. त्यात कोणतीही कपात (रिकव्हरी) केली जाणार नाही**" असे स्पष्टपणे शासनातर्फे मान्य करण्यात आले होते. शासनाने न्यायालयात काय मान्य केले आहे याची पूर्ण माहिती असूनही १० मे २०१३ नंतरही उलट आदेश काढण्यात आले व त्या तारखेपूर्वीचे उलटे आदेश मागे घेतले गेले नाही. नांदेडच्या सहसंचालकांनी १४.२.२०१३, २१.२.२०१३, २५.२.२०१३, ६.६.२०१३, २६.२.२०१३, व २६.६.२०१३ रोजी वेगवेगळे आदेश काढून "**त्यांची सेवा नेमणूकीच्या तारखेपासून न धरता पीएचडी पदवी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून धरून नव्याने स्थाननिश्चिती करून त्याप्रमाणे त्यांच्या सर्व्हिस बुकात नोंद करा**" असे आदेशित केले. अर्जदारांनी न्यायालयात या आदेशांना आव्हानित केले. मा. उच्च न्यायालयाने याबाबतीत दिनांक २८ ऑगस्ट रोजी निर्णय दिला व सहसंचालकांचे हे सर्व आदेश निष्प्रभावित व रद्दबादल ठरविले. निकालातील मूळ शब्द "**quashed and set aside, and would be ineffective and inoperative.**" असे आदेश या प्रकरणात दिले.

२२.३ विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची पात्रता मा. राज्यपालांच्या संमतीने करण्यात आलेल्या परिनियमांनीच ठरविता येते अशी विद्यापीठ कायद्यात तरतुद होती व आजही आहे. सन १९९१ ते २००० या काळामध्ये नेट-सेटची पात्रता परिनियमांनी कधीही सक्तीची करण्यात आलेली नव्हती. शासननिर्णय काढून तसे करता येत नाही. ही गोष्ट बाजूला ठेवली तरी त्या काळात तसा शासननिर्णय सुद्धा काढण्यात आलेला नव्हता. हे आता स्पष्ट झाले आहे. शैक्षणिक पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लावता येत नाही असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. त्याच निर्णयात असेही स्पष्ट करण्यात आले की विद्यापीठ अनुदान आयोगाने "नेट-सेटपासून मुक्तता" दिली असेल तर त्या शिक्षकांच्या सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून नियमित कराव्या लागतील. या सर्व शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने "नेट-सेट मुक्तता" प्रदान केलेली आहे.

२२.४ विद्यापीठ अनुदान आयोगाने नेटसेट मुक्तता दिल्यानंतर नियमानुसार सर्व लाभ, मुख्यत्वे स्थाननिश्चितीचे (CAS) लाभ, ज्यांना अदा करण्यात आलेले आहेत अशा शिक्षकांची संख्या महाराष्ट्रात तीन ते चार हजाराच्या जवळपास आहे. नेमणूकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून त्यांना सर्व आर्थिक लाभ मिळालेले आहेत, आजही मिळत आहेत. काही अधिकाऱ्यांचे टोळके त्यांना 'खरडण्याच्या' मागे लागलेले होते. अधिकाऱ्यांनी केलेले असे दोन प्रयत्न मा. उच्च न्यायालयांच्या विविध खंडपीठांनी यापूर्वी हाणून पाडले होते.

२२.५ स्थाननिश्चितीचे देण्यात आलेले लाभ काढून घेण्याच्या प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक १८९३ मध्ये पुढील प्रमाणे निर्णय दिला होता. :- "Admitted position is that the Petitioner in these petitions are working as Lecturers in different Colleges affiliated to Pune University. It is also common ground that their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier. They were also paid in the senior scale and the selection grade as per the Government Resolution dated 11th December, 1999. It is also an admitted position that now by the orders which are impugned in these petitions, the Joint Director, Higher Education has cancelled the order made by him earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade. It is also an admitted position that this has been done without issuing any show cause notice to the Petitioners. In our opinion, the orders made in favour of the Petitioners as a result of which there was enhancement in the pay package of the Petitioners, could not have been cancelled by the Joint Director without hearing and issuing show cause notice to them. As it is an admitted position that the orders granting senior scale and selection grade have been cancelled without granting an opportunity of being heard to the Petitioner, in our opinion, those orders will have to be set aside. In the result, therefore, all the petitions succeed and allowed. The orders impugned in the petitions, whereby the orders made earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade have been cancelled, are set aside, with liberty to the Respondent No.2 to make fresh order in accordance with law. All the contentions available to both sides are kept open. Rule made absolute. No order as to costs."

२२.६ मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २४ मार्च २०११ रोजी १९९१ ऑफ २०११ या अशाच प्रकरणात पुढील प्रमाणे निर्णय दिला होता. :- "Admittedly, the petitioners in the present petitions are appointed as Lecturers in different colleges in this region. Admittedly, their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier as per the applicable Government Resolution dated 11th December, 1999. Admittedly, **the Joint Director of Higher Education, Pune Region has cancelled the order of earlier pay fixation. It is admitted fact that this exercise was carried without issuing any show cause notices to the petitioners.** Thus, the petitioners are adversely affected by the order without granting an opportunity of being heard. In our opinion, therefore, those orders will have to be set aside. Further, some of the Lecturers working within the jurisdiction of Pune University with the similar grievances have succeeded on this ground, **vide order dated 3rd September, 2010 passed in writ petition No. 1893/2010 and five other writ petitions,** a copy of which is placed before us by learned counsel for the petitioners. In the result, all the petitions succeed and are allowed. **The impugned orders are set aside with liberty to the Joint Director of Higher Education to make fresh order in accordance with law.** All the contentions to both the sides are kept open. Rule made absolute. No order as to costs."

२२.७ **पहिल्या दिवसापासून सेवा धरून प्रत्यक्षात आर्थिक लाभ देण्यात आलेल्या शिक्षकांची संख्या तीन ते चार हजाराच्या घरात आहे.** या शिक्षकांना

The decision / directions dated 30-03-2010 of the HRD Ministry, Union of India, would not be able to hold back the benefits under the decision of the UGC.

*( See Para 30 of the High Court Judgement on page 236 of 2013 NUTA Bulletin )*

कायदेशिररित्या अनुज्ञेय झालेले हे लाभ बेकायदेशीरपणे काढून घेण्याचा प्रयत्न वर नमूद केल्याप्रमाणे **पहिल्यावेळी** ३० सप्टेंबर २०१० रोजी (सन २०१० ची याचिका क्रमांक १८९३ या प्रकरणामध्ये) मुंबई खंडपीठाने व **दुसऱ्या वेळी** दिनांक २४ मार्च २०११ च्या निर्णयान्वये (सन २०११ ची याचिका क्रमांक १९९१ या प्रकरणात) औरंगाबाद खंडपीठाने हाणून पाडला. मात्र या दोनही प्रकरणात निर्णय प्रश्नाच्या गुणवत्तेवर झालेला नव्हता तर तो तांत्रिक मुद्यांवर व निसर्गन्यायाच्या तत्त्वाचे पालन न केल्यामुळे झाला होता. "**संबंधितांचे म्हणणे ऐकून न घेता आदेश काढले**" या कारणावरून आदेश रद्दबादल करण्यात आले होते. दोनही प्रकरणामध्ये कायद्यानुसार कारवाई करण्याची मोकळीक सहसंचालकांना "The Joint Director of Higher Education to make fresh order in accordance with law." या शब्दात देण्यात आलेली होती.

**२२.८** ज्या शिक्षकांना नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरून सर्व लाभ देण्यात आलेले आहेत. त्यातील काहींच्या बाबतीत "रिकव्हरी" काढण्याचा **तिसरा प्रयत्न** मा. औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २८ ऑगस्ट २०१३ रोजीच्या या निर्णयाने हाणून पाडला आहे. हा निर्णय प्रश्नाच्या गुणवत्तेवर झालेला आहे असे आपणास दिसून येईल. "म्हणणे ऐकून न घेता रिकव्हरी काढली" ही बाब या प्रकरणातसुद्धा होतीच. मात्र मा. खंडपीठाने त्या मुद्यावरून निर्णय दिलेला नसून प्रश्नाच्या गुणवत्तेच्या मुद्यांवरून निर्णय दिलेला आहे.

**२२.९** "ही 'रिकव्हरी' काढणे योग्य कसे आहे" याबाबतचे शासनाचे/सहसंचालकाचे म्हणणे न्यायालयाने ऐकून घेतले व त्याची आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ८ व ९ मध्ये नोंदही केलेली आहे. सहसंचालकातर्फे रिकव्हरीचे समर्थन करतांना **पहिला मुद्दा** या सर्वांच्या सेवा "ॲडव्हाक" आहेत असा मांडण्यात आला. **दुसरा मुद्दा** १८ ऑक्टोबर २००१ च्या शासननिर्णयाचा मांडण्यात आला होता. त्या निर्णयाप्रमाणे पीएचडी. मिळाल्याच्या तारखेपासून सेवा धरली जाईल असे त्यात आहे. **तिसरा मुद्दा** विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झम्शन देतांना ते कोणत्या तारखेपासून द्यावे ते कळविले नाही हा होता व **चौथा मुद्दा** २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाबाबतचा मांडला गेला. **मुख्यत्वे या चार मुद्यांच्या आधारे सहसंचालकांनी आपल्या रिकव्हरीच्या आदेशाचे समर्थन या प्रकरणात केले होते.**

**२२.१०** मा. उच्च न्यायालयाने सहसंचालकांनी उपस्थित केलेल्या चारही मुद्यांचा आपल्या निर्णयात यथायोग्य समाचार घेतलेला आहे.

(i) **पहिला मुद्दा** : "ॲडव्हॉक सर्व्हिस" असण्याबाबतचा : त्याबाबत मा. खंडपीठाने असे नमुद केले आहे की, "This Court in its order dated 01.08.2013 has found that benefits of CAS cannot be denied to such teachers by considering them ad hoc appointees."

(ii) १८ ऑक्टोबर २००१ च्या शासननिर्णयाचा **दुसरा मुद्दा** सहसंचालकांनी उपस्थित केला. त्याला मा. खंडपीठाने पुढील शब्दात :- "Under the circumstances Government Resolution dated 18.10.2001 is of little significance and cannot be relied upon or resorted to, to support the impugned actions. Having regard to the aforesaid, the recourse to government resolution dated 18.10.2001 by the concerned authorities, is of no avail to them to justify the impugned orders." गैर ठरविले आहे.

(iii) **तिसरा मुद्दा** : विद्यापीठ अनुदान आयोगाने ५.११.२००८ च्या पत्रात एक्झम्शन देतांना कोणत्या तारखेपासून लाभ द्यावेत हे आम्हाला कळविले नाही. याबाबत मा. न्यायालयाने १६ ऑगस्ट २०११ रोजी प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना पाठविलेल्या व त्यानंतर त्याच महिन्यात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सचिवांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २६ ऑगस्ट २०११ रोजी पाठविलेल्या पत्राचा निर्णयाच्या परिच्छेद १८ मध्ये उल्लेख करुन "It is also not in dispute that the UGC has resolved to grant exemption to the teachers who were appointed during 1991 to 2000 and has also stated that *Therefore, the services of such teachers, for all purpose, should be counted from the date of their regular appointment*. (Vide communication of UGC dated 26.08.2011)." असा निर्णय दिलेला आहे. या दोनही पत्रांचा या निर्णयाच्या परिच्छेद १२ मध्ये सुद्धा तपशीलवार उल्लेख आहे.

(iv) **चौथा मुद्दा** : २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाबाबत सुद्धा मा. खंडपीठाने सहसंचालकांचे म्हणणे परिच्छेद १५ व १६ मध्ये अमान्य केले ते पुढील शब्दात :-

"It appears that in Writ Petition (Lodging) No.1326/2012, a statement was made on behalf of the State Government that Government Resolution would be issued exempting teachers, who were appointed after following prescribed procedure during the period from 19.09.1991 to 03.04.2000, and stating that a GR will be issued granting exemption from NET / SET to those teachers who were appointed during 1991 to 2000 and the Government and the Universities would protect the pay fixation, including increments already paid to the teachers and, therefore, there will be no recovery of annual increments which the teachers have already earned.....It is nobodys case that the petitioners are not otherwise qualified or their appointments have not been approved by the University or they do not possess requisite qualifications except NET / SET. ..... It is also not the case of the respondent authorities that the petitioners do not fulfill the conditions referred to in the Government Resolution dated 27.06.2013."

**२२.११** गुणवत्तेवर सहसंचालकांचे सर्व मुद्दे खोडून काढले व 'रिकव्हरी'चे आदेश रद्द करणारा निर्णय मा. खंडपीठाने परिच्छेद २१ मध्ये पुढीलप्रमाणे दिलेला आहे. :- "Consequently, all the petitions succeed. The impugned communications dated 14.02.2013, 21.02.2013 (Writ Petition No. 5810/2013) 25.02.2013 (Writ Petition No.5272/2013), 06.06.2013 issued by Joint Director of Higher Education and further communications issued by the respondent No.6 college dated 26.02.2013 (in Writ Petition No. 5810/2013) and 26.06.2013 pursuant thereto, **stand quashed and set aside, and would be ineffective and inoperative.**"

**२२.१२** ज्या शिक्षकांना नेमणूकीच्या दिनांकापासून सर्व लाभ यापूर्वीच देण्यात आलेले आहेत त्यांची रिकव्हरी काढण्याचे आदेश गुणवत्तेवर रद्द करण्याचा निर्णय मा. उच्च न्यायालयाने दिला आहे हा तीन ते चार हजार शिक्षकांना लागू पडतो. ज्या शिक्षकांना हे लाभ देण्यात आलेले नाहीत त्यांना ते व्याजासकट देण्यात यावेत असाही निर्णय मा. उच्च न्यायालयाने वेगळ्या प्रकरणात १ ऑगस्ट २०१३ रोजी दिला आहे. एकामागून एक न्यायालयाचे निर्णय विरोधात जात असतांना आपली बेकायदेशीर कृत्ये दुरुस्त करून न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करणे हा सन्मानजनक मार्ग शासनासाठी खुला आहे. शिक्षकांचा द्वेष करणाऱ्या काही अधिकाऱ्यांचा सल्ला मान्य करून सर्वोच्च न्यायालयात अपिलासाठी विशेष परवानगी मागणारा अर्ज दाखल करण्याचा दुसरा एक सल्ला शासनाला दिला गेला आहे. त्या स्थितीत उपरोक्त लाभान्वित व लाभवंचित अशा दोनही प्रकारच्या नेटसेटमुक्त शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयात 'हजर' व्हावे लागेल. ज्यांना कोणतेही लाभ मिळालेले नाहीत अशा अंदाजे पाच हजार शिक्षकांनी ती तयारी सुरू केलेली आहे. ज्यांना सर्व लाभ मिळालेले आहेत अशा तीन ते चार हजार शिक्षकांना आता तयारीला लागावे लागेल.

After going through the directions issued by HRD Ministry on 30-03-2010, it appears that those may at the most govern the appointments subsequent to 2008

*( See Para 28 of the High Court Judgement on page 236 of 2013 NUTA Bulletin )*

**२३. नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबत शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा चौथा तडाखा :**

त्यानंतर मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १३ सप्टेंबर २०१३ रोजी तत्सम प्रकरणी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ४९९४ मध्ये आणखी एक चौथा तडाखा देणारा निर्णय दिला. त्यामध्ये १९९१ ते २००० या काळात झालेल्या या नेमणूकांच्या बाबतीत तुमचा १८ ऑक्टोबर २००१ चा शासननिर्णय काही उपयोगाचा नाही असे मा. खंडपीठाने पुन्हा एकदा पुढील शब्दात नमूद केले :- "Having regard to the decision rendered by this Court in the said group of petitions as well as to the position that the Government Resolution dated 18.10.2001, being of little significance, recourse to Government Resolution dated 18.10.2001 in the face of Government Resolution dated 27.06.2013, is unsustainable and as such the impugned orders dated 21.02.2013 and 06.06.2013 issued by the Joint Director of Higher Education, Nanded Region, Nanded and further communications issued pursuant to the same are liable to be quashed and set aside and same are accordingly quashed and set aside and would be ineffective and inoperative." या प्रकरणी रिकव्हरी काढणारे नांदेडच्या सहसंचालकांचे आदेश न्यायालयाने रद्दबादल ठरविले. *(Full text of the judgement is circulated on page 205 to 206 of 2013 NUTA Bulletin)*

**२४. नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबत शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा पाचवा तडाखा :**

मा. उच्च न्यायालयाचे एका मागून एक आदेश होत असतांना नांदेडच्या सहसंचालकांनी निर्णयाधिन प्रकरणातील शिक्षकांच्या बाबतीत रिकव्हरीचे आदेश तर परत घेतले नाहीतच पण "**जोपर्यंत रिकव्हरी होत नाही तोपर्यंत या सर्व शिक्षकांचे पगार थांबवा**" असे आदेश ६ जून २०१३ रोजी काढले होते. मा. खंडपीठाने रिकव्हरी काढणारे व पगार थांबविणारे नांदेडच्या सहसंचालकांचे आदेश पुढील शब्दात रद्दबादल ठरविले '"Accordingly, the communications dated 6.6.2013 (Exhs. S and J to respective writ petitions), issued by respondent no. 3 are, quashed and set aside. Eventually, **detained salaries of petitioners be released as early as possible**" नेटसेटमुक्त शिक्षकांबाबतच्या शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला तडाखा देणारा मा. औरंगाबाद खंडपीठाचा हा पाचवा निर्णय आहे. दिनांक १० ऑक्टोबर २०१३ रोजी उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६६५९ मध्ये हा निर्णय दिलेला आहे. *(Full text of the judgement is circulated on page 216 of 2013 NUTA Bulletin)*

**२५. नेट-सेटमुक्त शिक्षकांबाबत शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा सहावा तडाखा :**

सन १९९१ ते २००० या कालखंडात महाराष्टात सेवेत भरती झालेल्या नेटसेटग्रस्त प्राध्यापकांच्या बाबतीत "**तो प्राध्यापक नेट सेट पात्रता धारण करीत नाही म्हणून त्याची सेवा अॅडव्हॉक म्हणता येणार नाही. त्याची सेवा कायम स्वरुपीच समजावी लागेल व त्याला जुनी पेन्शन योजना नाकारता येणार नाही**" असा सुस्पष्ट निर्णय मा. उच्च न्यायालयाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ३१२२ मध्ये दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेला असून महाराष्ट्र शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायलयातर्फे हाणण्यात आलेला हा सहावा तडाखा आहे. हा प्रसाद मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाकडून मिळालेला आहे. **मुळात हा निकाल २४ ऑक्टोबर २००० रोजी महाविद्यालयीन न्यायाधिकरणाने दिलेला होता, तो आता मा. मुंबई खंडपीठाने ठाम शब्दात कायम केला आहे.** *(Full text of the judgement is circulated on page 218 of 2013 NUTA Bulletin)*

**२५.१** मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ३१२२ मध्ये हा जो निर्णय दिलेला आहे, त्या याचिकेमध्ये **श्रीमती मनिषा नवनाथ कांबळे** या अर्जदार होत्या. त्यांचे पती **श्री. नवनाथ भैरू कांबळे** हे दिनांक १६ ऑक्टोबर १९९५ रोजी सांगोला येथे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून नियुक्त झाले होते. महाविद्यालयाने त्यांना सेवामुक्त केले. या आदेशाविरुद्ध प्रा. नवनाथ कांबळे यांनी महाविद्यालयीन न्यायाधिकरणापुढे अपिल केले होते. दिनांक २४ ऑक्टोबर २००० रोजी या अपिलाचा "The College Tribunal allowed the appeal by order dated 24th October 2000 and directed reinstatement of the petitioner with backwages and other consequential benefits." असा निकाल लागला.

**२५.२** "प्रा. नवनाथ कांबळे हे नेट-सेट पात्रता धारण करीत नसल्यामुळे त्यांची नेमणूक तदर्थ आहे व आपण सेवेत कायम आहोत असा दावा ते करू शकत नाहीत" असे प्रतिपादन शासनातर्फे सहसंचालकांनी अपिलात केले होते. असे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये नमूद आहे, ते पुढील प्रमाणे :- "Joint Director filed a written statement and contended that approval has been granted to the appointment of the petitioner's husband on probation by the University subject to condition of the petitioner's husband passing NET/SET examination. It was contended that the petitioner's husband can't claim his appointment as a regular appointment." मा. उच्च न्यायालयाच्या याच निर्णयाच्या त्याच परिच्छेदात पुढे असेही नमुद आहे की, "मा. न्यायाधिकरणाने त्यावेळीच सहसंचालकांचा हा दावा पुढील शब्दात फेटाळून लावला होता. "In paragraph 3 of the Judgment of the Tribunal it is held that after publishing proper advertisement, duly constituted Selection Committee conducted the interviews. The appointment was made by the duly constituted Selection Committee. ..... I find that the Appellant has become permanent teacher on SC post on 15.11.97 and his services cannot be terminated. Therefore, I find that the order of reduction dated 30.9.97 and the order of termination dated 19.3.98 terminating the services of Appellant w.e.f 22.4.98 are not legal, valid, proper and correct."

**२५.३** न्यायाधिकरणाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे असे नमूद केले होते की, "It is declared that the Appellant is in continuous service on full time post of teacher in the subject English from 15.11.95 and the Appellant is permanent and confirmed full time teacher in the college of Respondent Nos.1 and 2 and he is entitled to all benefits of permanent teacher. The Respondent Nos.1 and 2 are directed to reinstate the Appellant on full time post of lecturer in English w.e.f 1.10.97 and to pay him arrears of salary from 1.10.97 till the date of reinstatement."

**२५.४ महाविद्यालयीन न्यायाधिकरणाच्या या निर्णयाविरुद्ध संस्थेने मा. उच्च न्यायालयापुढे याचिका दाखल केली होती. ती याचिका मा. उच्च न्यायालयाने २३ जानेवारी २००१ रोजी दाखल करून घेण्याच्या टप्प्यावरच फेटाळली.**

As such, it would not be appropriate to keep the present set of petitioners away from the benefit ensuing from decisions taken under such resolution passed prior to the directions issued by HRD Ministry on 30-03-2010 and even after the same particularly resolution dated 08-07-2011 referred to hereinabove, in the cases which involve closely identical facts and circumstances.

*( See Para 26 of the High Court Judgement on page 236 of 2013 NUTA Bulletin )*

**दुर्दैवाने १३ नोव्हेंबर २००५ रोजी प्रा. नवनाथ कांबळे यांचे दुःखद निधन झाले.** त्यांच्या पत्नी श्रीमती मनीषा कांबळे यांनी महाविद्यालयामार्फत कुटुंबनिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव दिनांक २० जुलै २०११ रोजी कोल्हापूरच्या उच्च शिक्षण सहसंचालकांकडे सादर केला. प्रा.कांबळे हे नेट-सेट नाहीत म्हणून सहसंचालकांनी शासनाचे मार्गदर्शन मागितले व मार्गदर्शनाच्या नावाखाली कुटुंब निवृत्तीवेतनाचा हा प्रस्ताव 'पाडून' ठेवला. प्रस्ताव पेंडीग ठेवण्याच्या सहसंचालकांच्या या कृतिविरूद्ध श्रीमती मनीषा कांबळे यांनी उच्च न्यायालयात आताची ही याचिका (२०१३ ची क्रमांक ३१२२) दाखल केली होती. २६ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात पुढील प्रमाणे निर्णय दिला. :- "We are, therefore, of the view that the pension proposal of the petitioner's husband cannot be kept pending on the footing that the appointment of the petitioner was on adhoc basis."

२५.५ मा. उच्च न्यायालयाने आपल्या या निकालात ठामपणे न्यायाधिकरणाचा निर्णय कायम केला आहे. तो पुढील प्रमाणे :- "Thus, there is a categorical finding recorded by the Tribunal that the petitioner's husband was in continuous service on full time post of teacher of English subject from 15.11.1995. A specific declaration is made that he was permanent and confirmed full time teacher and that he was entitled to all benefits as a permanent teacher." इतकेच नव्हे तर न्यायाधिकरणापुढे प्राचार्य, सहसंचालक, व्यवस्थापन, विद्यापीठ हे सारेच प्रतिवादी होते. त्यामुळे तो निर्णय त्या सर्वांवर बंधनकारक आहे असे ठामपणे मा. उच्च न्यायालयाने नमुद केले आहे ते पुढील शब्दात :- "We must note here that not only the Joint Director of Education but the Registrar of Shivaji University as well as the Principal of the College and the Management were parties to the appeal. The order of the Tribunal has attained finality. Therefore, the order binds all concerned parties."

२५.६ श्री. नवनाथ कांबळे यांची नेमणूक तदर्थ आहे हे शासनाचे म्हणणे निराधार आहे, असा स्पष्ट निर्वाळा मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ८ मध्ये पुढील शब्दात नोंदला आहे. : "Therefore, the contention raised in the communication dated 20th June 2011 that the appointment of the petitioner's husband appears to be on adhoc basis is baseless." मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ३१२२ मध्ये दिलेला हा निर्णय सन २०१३ च्या नुटा बुलेटीन पृष्ठ २१८ वर प्रकाशित केलेला आहे.

**२६. नेटसेटमुक्त शिक्षकांबाबत शासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा सातवा तडाखा :**

मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने २०५ प्राध्यापकांच्या प्रकरणी दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये आणखी एक निर्णय दिलेला असून नेटसेट मुक्त शिक्षकांबाबतच्या राज्यशासनाच्या आकसपूर्ण भूमिकेला मा. उच्च न्यायालयाचा हा सातवा तडाखा आहे. या याचिकेमध्ये समाविष्ट असलेल्या २०५ प्राध्यापकांच्या बाबतीत २३ फेब्रुवारी २०१० च्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट मुक्तीचा निर्णय घेतला होता पण नंतर मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ३० मार्च २०१० च्या आदेशाचे निमित्त पुढे करून मुळातील देण्यात आलेली नेटसेट मुक्तता रद्द करण्याचा आयोगाने निर्णय घेतला. त्यामुळे या २०५ प्राध्यापकांनी न्यायालयात धाव घेतली.

२६.१ सन १९९१ ते २००० या कालखंडात महाराष्ट्रामध्ये विधिवतरित्या सेवेत आलेल्या बिगरनेटसेट प्राध्यापकांच्या बाबतीत काही प्राध्यापकांना नेटसेटमुक्तता प्रदान करावयाची व ३० मार्च २०१० च्या केंद्र शासनाच्या आदेशांचे निमित्त करुन इतरांच्या बाबतीत निर्णय घ्यायचा नाही, अशा वर्तणुकीमुळे **समान स्थितीत असलेल्या प्राध्यापकांमध्ये अत्यंत तिरस्कार उत्पन्न करणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीला जन्म देणारा लहरी व छांदिष्ट निर्णय घेऊन वंचित प्राध्यापकांचा अवसानघात करता येणार नाही** असा हा स्पष्ट निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. मा. न्यायालयाच्या निर्णयातील शब्दरचनेचे सौम्य असे मराठी भाषांतर वर दिलेले आहे. मुळात या निर्णयातील परिच्छेद २९ मधील मुळ तिखट शब्दरचना पुढील प्रमाणे आहे. :- " In view of this and having regard to the earlier decisions of this court and particularly the subsequent resolution by UGC after 30-03-2010 as referred to above, keeping away the petitioners cases from being considered for the benefit of exemption with reference to the directions of the HRD Ministry would give rise to **invidious discrimination** among similarly situated persons under the **capricious decisions** leaving the petitioners **in lurch.**"

२६.२ आम्ही या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे पुढील चार महिन्याच्या आत हा भेदभाव संपुष्टात आणणारी (नेटसेट मुक्तीची) कृति सर्व संबंधितांनी पार पाडावी व या शिक्षकांना सर्व अनुषंगिक व तद्जन्य लाभ उपलब्ध करून द्यावेत (३० मार्च २०१० च्या केंद्र शासनाच्या आदेशात अडकून न पडता) असे आदेश मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३१ मध्ये पुढील शब्दात दिलेले आहेत. "We, therefore, direct the concerned authorities to consider petitioners cases for grant of exemption from passing NET/SLET with reference to observations hereinabove and give them consequential and incidental benefits. We expect that such exercise would be done expeditiously, preferably within a period of four months without being trammeled by decision / direction dated 30-03-2010 of HRD Ministry."

२६.३ नेटसेटची पात्रता महाराष्ट्रामध्ये सन २००० च्या सुरुवातीपर्यंत लागूच नव्हती असे प्राध्यापक संघटना गेली अनेक वर्षे सांगत आहेत. तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्री श्री दिलीप वळसे पाटील यांनी विधानपरिषदेत दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी ही गोष्ट मान्य केली होती. विधानपरिषदेतील त्या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने मा. उच्च न्यायालयासमोरील अनेक याचिकांमध्ये सहपत्रे म्हणून जोडण्यात आलेली आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने हीच गोष्ट आता मा. उच्च न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र दाखल करून सादर केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये पुढील शब्दात त्याचा उल्लेख आहे :- "It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by Government of Maharashtra providing for eligibility tests by UGC or tests accredited by UGC "

२६.४ सन १९९९ च्या शेवटी शेवटी ही पात्रता परीक्षा महाराष्ट्रात लागू करण्यात आली याचाही स्पष्ट उल्लेख या निर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये आहे तो पुढील शब्दात :- "It appears that in 2000, the State government was directed by UGC to make NET/SLET qualification necessary and thereupon, government resolution had

**FURTHER, WE FIND THAT REGULATIONS 2009 ARE IN NO WAY RETROSPECTIVE IN NATURE.**

In fact, they are prospective in as much as they apply to appointments made or proposed to be made after the date of notification and do not apply to appointments made on regular basis prior to the said date.

*( See Para 27 of the High Court Judgement on page 236 of 2013 NUTA Bulletin )*

been issued directing termination of services of persons appointed after 11-12-1999. "

२६.५ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक १० जून २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना कायदेशीर मुद्यांचे एक तपशिलवार टिपण सादर केलेले होते. त्यात क्रमांक १८ वर पुढील मुद्दा नमुद होता.

"18. Hon'ble Delhi High Court in petition No. 13689 of 2009 gave a verdict on 6th December 2010. Para 36 of the said judgement is as follows :-

"36. Further, we find that Regulations 2009 are in no way retrospective in nature. In fact, they are prospective inasmuch as they apply to appointments made or proposed to be made after the date of notification and do not apply to appointments made on regular basis prior to the said date."

२६.६ मा. दिल्ली उच्च न्यायालयाचा हा ३७ परिच्छेदांचा संपूर्ण निर्णय सन २०११ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ १३ ते ३० वर त्यापूर्वी शब्दशः प्रसृत करण्यात आला होता. महासंघाच्या प्रत्येकच निवेदनामध्ये या मुद्याचा समावेश होता. तसा तो वर नमूद केलेल्या कायदेशीर मुद्यांच्या टिप्पणामध्येसुद्धा समाविष्ट होता. या टिपणावर तज्ञ सल्लागारांचे अभिप्राय घेऊनच आयोगाने आपला निर्णय घेतला होता. प्रामाणिकपणे, कष्टपूर्वक व चिकाटीने आपली बाजू मांडत राहीले तर त्याचा निश्चितच परिणाम होतो. महासंघाने आपल्या कायदेशीर मुद्यांच्या टिपणामध्ये वर नमूद केलेला जो मुद्दा विद्यापीठ अनुदान आयोगासमोर मांडला होता. तो आता विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या शपथपत्रात मा. उच्च न्यायालयासमोर मांडला असून त्याचा अत्यंत यथार्थ उल्लेख मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयात परिच्छेद २७ मध्ये आलेला आहे तो पुढील शब्दात:-

"In the affidavit by UGC, an extract of decision of Delhi High Court in ***WP (C) No. 13689 of 2009 (All India Researchers Coordination Committee and ors. vs. Union of India and ors.)*** and ***WP (C) 2780 of 2010 (Sarika Chaudhary vs. Union of India and ors)*** has been produced. While deciding against the challenge to validity of UGC s third amendment to Regulations, 2009, it has been observed:-

*36. Further, we find that Regulations 2009 are in no way retrospective in nature. In fact, they are prospective in as much as they apply to appointments made or proposed to be made after the date of notification and do not apply to appointments made on regular basis prior to the said date. "*

२६.७ सन २००९ चे रेग्युलेशन काय? किंवा ३० मार्च २०१० चे केंद्र शासनाचे आदेश काय? हे पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नाहीत. सन १९९१ ते २००० या काळात झालेल्या नेमणूकांना तर ते लागू करणे मुळीच योग्य नाही. ही भूमिका महासंघाने सातत्याने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे व केंद्र शासनाकडे मांडली. केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने महासंघाची ही भूमिका मान्य केली व विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक ३ नोव्हेंबर २०१० रोजी पत्र लिहून ती पुढील शब्दात कळविली होती. :- "The above mentioned resolution perhaps does not take into account the fact that appointments, If any, pursuant to the date of coming into force of these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective dates. Similarly, since by Commissions own admission, the regulations are prospective in nature and not retrospective."

२६.८ आता विद्यापीठ अनुदान आयोगाने ही भूमिका मान्य केली असुन मा. दिल्ली उच्च न्यायालयाचा ६ डिसेंबर २०१० चा निर्णय पूरावा म्हणून सोबत जोडून मा. औरंगाबाद उच्च न्यायालयासमोर आयोगाने शपथपत्र दाखल केले. मा. उच्च न्यायालयाने ते म्हणणे नुसते मान्य केले असे नव्हे तर सन १९९१ ते २००० या काळातील काही शिक्षकांच्या बाबतीत आयोगाने लवकर निर्णय घेतला व काहींच्या बाबतीत निर्णय घेण्यास उशीर केला म्हणून केंद्र शासनाच्या ३० मार्च २०१० च्या निर्णयाचे निमित्त करून आयोगाला भेदभाव करता येणार नाही. आम्ही या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे पुढील चार महिन्याच्या आत हा भेदभाव संपुष्टात आणणारी (नेट-सेट मुक्तीची) कृती सर्व संबंधितांनी पार पाडावी व या शिक्षकांना सर्व अनुषंगिक व तद्जन्य लाभ उपलब्ध करून द्यावेत (३० मार्च २०१० च्या केंद्र शासनाच्या आदेशात अडकून न पडता) असे आदेश मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३१ मध्ये पुढील शब्दात दिलेले आहेत. "We, therefore, direct the concerned authorities to consider petitioners cases for grant of exemption from passing NET/SLET with reference to observations hereinabove and give them consequential and incidental benefits. We expect that such exercise would be done expeditiously, preferably within a period of four months without being trammeled by decision / direction dated 30-03-2010 of HRD Ministry." *(Full text of the judgement is circulated on page 234 to 236 of 2013 NUTA Bulletin)*

२७. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्वच खंडपीठासमोर याबाबतच्या याचिकांची प्रक्रिया सुरू आहे. अनेक याचिकांचे निर्णय लागले असून अनेक याचिका सुनावणीच्या प्रतिक्षेत आहेत, काही ठिकाणी त्या अजूनही दाखल होत आहेत. या प्रत्येक प्रकरणामध्ये याचिकेसोबत जोडावयाची कागदपत्रे, त्याच्या स्वच्छ प्रतिसह तयार करवून घेणे किंवा उपलब्ध करवून घेणे, आपल्या विधिज्ञांकडे ती कागदपत्रे सोपवून त्यांच्यामार्फत याचिकेत विविध परिच्छेदांची व सहपत्रांची रचना होत असतांना आपल्या विधिज्ञांना मदत करणे, 'प्रेअर क्लॉज' हा यथोचित झाला पाहिजे याची काळजी घेणे, त्यानंतरच्या सर्व औपचारिकता पूर्ण करून याचिका दाखल होणे हे कष्टपूर्वक व मेहनतीने करावयाचे काम असते. शुक्रवार, दिनांक ९ ऑगस्ट २०१३ रोजी झालल्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने याबाबतीत घेतलेल्या निर्णयातील परिच्छेद ३६ (तीन) मधील मजकूर पुढील प्रमाणे :-

"सध्याच्या परिस्थीतीत आंदोलनाच्या मार्गाने किंवा विधानमंडळाच्या मार्गाने हा प्रश्न सुटू शकण्याची बाब पूर्णपणे संपुष्टात आलेली आहे असे पक्केपणी समजून चालावे व कायद्याचे प्रश्न त्यामध्ये गुंतलेले असल्याने न्यायालयाच्या मार्गानेच ठामपणे यशाच्या दृष्टीने दृढनिश्चयपूर्वक वाटचाल करण्याचा भाग म्हणून न्यायालयीन याचिकांच्या मजबूत बांधणीसह ठोस व भक्कम अशा प्रकारचा न्यायालयीन संघर्ष उभा करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. मा. औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय होण्यापूर्वी अशा बहुयाचिका दाखल होण्यामुळे या प्रकरणाच्या न्यायालयीन प्रवासाचा घटनाक्रम कसा राहिला असता व आता मा. औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय झाल्यामुळे अशा बहूयाचिका दाखल होण्यामुळे तो प्रवास कसा होईल याची विधी क्षेत्रातील तज्ञांशी चर्चा करून कार्यकारी मंडळाने विचारपूर्वक हा निर्णय घेतलेला आहे. हे मुद्दाम नमूद करण्यात येत आहे." महासंघाच्या या निर्णयाप्रमाणे मा. उच्च न्यायालयासमोर या याचिका दाखल करण्याचे काम व पुढील प्रक्रिया सुरू असतांना, महासंघाचे पदाधिकारी, विद्यापीठ स्तरावरील संघटनांचे पदाधिकारी व संबंधित शिक्षक कार्यकर्ते याचे लक्ष उच्च न्यायालयाच्या स्तरावरील कष्टपूर्वक करावयाच्या कामावरून विचलीत होईल अशी कोणतीही व कोणाचीही खेळी यशस्वी होणार नाही याची सर्वांनीच काळजी घेण्याची गरज आहे.

२८. गुणवंत प्राध्यापक व शासनातील काही अधिकारी यांचे साटेलोटे

We expect that such exercise would be done expeditiously, preferably within a period of four months without being trammeled by decision / direction dated 30-03-2010 of HRD Ministry.

*( See Para 31 of the High Court Judgement on page 236 of 2013 NUTA Bulletin )*

असल्याचे प्रत्येक आंदोलनाच्या वेळी उघडपणे व जाहीरपणे दिसून आले होते. आजही त्याचे प्रत्यक्ष व उघड दर्शन होत आहे. "महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने एक शासननिर्णय काढून १९ सप्टेंबर १९९१ ते २३ ऑक्टोबर १९९२ या कालावधीत नेटसेट, एम.फिल., पीएच.डी. यातील कोणतीही पात्रता धारण न करणाऱ्या प्राध्यापकांना सरसकट सूट देण्याचे जाहीर केले. या निर्णयामुळे या कालावधीमध्ये रूजू झालेल्या प्राध्यापकांना २२

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

## जिल्हा अधिवेशनांचे आयोजन

विदर्भातील नुटाच्या सर्व जिल्ह्यांची अधिवेशने एकाच दिवशी व दिनांकाला आयोजित करण्यात आलेली आहेत.

### दिवस व दिनांक

(१) जिल्हा अधिवेशनाचा दिनांक : १ डिसेंबर २०१३

(२) जिल्हा अधिवेशनाची वेळ : दुपारी ३.३० वाजता

(३) जिल्हा अधिवेशनाचा दिवस : रविवार,

### स्थळ

ही जिल्हा अधिवेशने खाली दर्शविलेल्या स्थळी होतील.

१. **नागपूर शहर :** सी.पी. ॲन्ड बेरार कॉलेज, रविनगर, नागपूर.

२. **नागपूर ग्रामिण :** सी.पी. ॲन्ड बेरार कॉलेज,रविनगर, नागपूर.

३. **वर्धा** : यशवंत महाविद्यालय, वर्धा.

४. **भंडारा :** जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा

५. **गोंदिया :** डी.बी.सायन्स कॉलेज, गोंदिया.

६. **चंद्रपूर :** एफ.ई.एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर.

७. **गडचिरोली :** किसनजी खोब्रागडे शिक्षण महाविद्यालय, गडचिरोली.

८. **अमरावती :** केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती.

९. **यवतमाळ :** अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ.

१०. **अकोला :** आर.एल.टी.सायन्स कॉलेज, अकोला.

११. **वाशिम :** राजस्थान आर्यन कॉलेज, वाशिम.

१२. **बुलढाणा** : जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा.

या सर्व जिल्हा अधिवेशनाला त्या त्या जिल्ह्याचे अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी संबोधीत करतील. या सभेमध्ये मुख्यत्वे पुढील प्रश्नांवर चर्चा होईल. :- (१) नेटसेटबाबत मा. उच्च न्यायालयासमोरील घटनाक्रमाचा आढावा घेणे. (शिवाय 'पुड्यां'चा आढावा) (२) सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिलार्थ परवानगी मागणारा शासनाचा अर्ज व त्याबाबत करावयाची उपाययोजना. (३) सहाव्या वेतन आयोगाची थकवाकी अदा करण्यासंदर्भातील सद्यस्थिती व करावयाच्या उपाययोजना. (४) इतर प्रश्नाबाबत चर्चा

सर्व प्राध्यापकांनी उपस्थित राहून जिल्हा अधिवेशने यशस्वी करावी. अशी विनंती आहे.

**प्रा. प्रवीण रघुवंशी,** ***अध्यक्ष*** **डॉ. अनिल ढगे,** ***सचिव***

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

### जिल्हा युनिटचे अध्यक्ष व सचिव यांची सभा

सर्व जिल्हा युनिटचे अध्यक्ष व सचिव यांची सभा रविवार, दिनांक १५ डिसेंबर २०१३ रोजी शिक्षक भवन, विद्यापीठ परिसर सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेमध्ये जिल्हा अधिवेशनामध्ये झालेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल व करावयाच्या उपाययोजना विचारात घेण्यात येतील. सर्व जिल्ह्याच्या अध्यक्ष व सचिवांनी या सभेला उपस्थित रहावे अशी विनंती करण्यात येत आहे.

**प्रा. प्रवीण रघुवंशी,** ***अध्यक्ष*** **डॉ. अनिल ढगे,** ***सचिव***

वर्षाचा वेतन फरक द्यावा लागणार आहे." अशी बातमी सांगून गुणवंत प्राध्यापकांनी त्यामागोमाग "यामुळे उच्च शिक्षण विभागावर फार मोठा आर्थिक बोजा पडणार आहे" अशी 'फुसकी' सोडली. "त्या तेरा महिन्याच्या काळात नेटसेट सक्तीचे केलेच नव्हते." असे खुद्द उच्च शिक्षण विभागातील अधिकारीच आता सांगत असतांना व तसा शासननिर्णयसुद्धा निर्गमित झालेला असतांना "त्या तेरा महिन्याच्या काळात सेवेत आलेल्या नेट-सेटमुक्त शिक्षकांचासुद्धा चेंदामेंदाच करा" अशी भावना व्यक्त करणाऱ्या गुणवंतांच्या व्यक्तिमत्वामध्ये क्रौर्य हा गुण मुबलकपणे असल्याशिवाय अशा भावनांचा जन्म होऊ शकत नाही.

**२९.** गुणवंत प्राध्यापकांच्या जिवाची अशी काहिली होत असल्याचे पाहून शासनातील काही अधिकाऱ्यांचा जीव खाली वर व्हायला लागला. ताबडतोबच अधिकृतपणे शासनातर्फे पत्रक काढून "महाराष्ट्रात नेट-सेट पात्रता परीक्षेबाबत २३ ऑक्टोबर १९९२ रोजी शासन निर्णय निघाल्यामुळे **त्यापूर्वी सेवेत असलेल्या प्राध्यापकांना ती लागू करता येणे शक्य नाही.** त्यामुळे १९ सप्टेंबर १९९१ ते २३ ऑक्टोबर १९९२ या कालावधीतील प्राध्यापकांना सूट देण्यात आली आहे, असे शासनाने म्हटले आहे." असे गुणवंत प्राध्यापकांनीच जाहीर केले पण ते करतांनासुद्धा "सरकार आणि युजीसी यांच्या निर्णयात विसंगती" असा पुकारा करायला गुणवंत विसरले नाहीत. युजीसीचे निर्णय वेगळे आहेत. सरकारच्या अशा बदलत्या भूमिकेमुळे नेट-सेट पात्रतेबाबतचा गोंधळ अधिकच वाढत आहे. असेही या गुणवंत गोंधळ्यांनी जाहीर केले. खरे म्हणजे त्यांनी तसे जाहिर करण्यापूर्वीच महाराष्ट्रातील वस्तुस्थिती कळल्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्टपणे वस्तुस्थितीवर आधारित भूमिका घेतली होती व ती १७ ऑक्टोबर २०१३ च्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयात परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ती पुढील शब्दात :- "It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by Government of Maharashtra providing for eligibility tests by UGC or tests accredited by UGC " नेटसेटची पात्रता महाराष्ट्रामध्ये सन २००० च्या सुरुवातीपर्यंत लागूच नव्हती असे प्राध्यापक संघटना गेली अनेक वर्षे सांगत आहेत.

**२९.१** महाराष्ट्रात नेट-सेटची पात्रता केंव्हा पासून लागू झाली नव्हती? व ती केंव्हा पासून लागू झाली होती? हे दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. **ती पात्रता १९९१ पासून लागू झाली नव्हती, हे आता सर्वांनाच कळले आहे.** सन १९९१ पासून ती लागू झालेली नव्हती हे सर्व विद्यापीठांना पूर्वीपासूनच ठाऊक होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ते आता लक्षात आले असून त्यांनी तसे शपथपत्रच मा. उच्च न्यायालयासमोर दाखल केलेले आहे. १९९१ पासून ती पात्रता महाराष्ट्रात लागू झाली नव्हती हे आता महाराष्ट्र शासनालाही कळले असून त्यांनी तसा शासननिर्णयच २७ जून २०१३ रोजी काढला आहे. राहता राहिला दुसरा प्रश्न व तो म्हणजे ही पात्रता महाराष्ट्रात केव्हा लागू झाली? या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर विद्यापीठ अनुदान आयोगाने "३ एप्रिल २०००" असे दिले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयातून या दोनही प्रश्नांची योग्य उत्तरे आता बाहेर आलेली आहेत. असे असले तरी "तीन सिंहमुद्रा धारण करणारी व 'सत्यमेव जयते' असा उद्‌घोष करणारी" राजमुद्राधारक अशी महाराष्ट्र शासन या नावाची जी संस्था" आहे त्या संस्थेला अजूनही ही तारीख कळलेली नाही. **महाराष्ट्रात ही नेट-सेटची पात्रता केंव्हा लागू झाली होती हे खुद्द महाराष्ट्र शासनाला केंव्हा ना केंव्हा कळलेच ना? जेंव्हा ते कळेल तेव्हा महाराष्ट्र शासनाला सुद्धा आपली भूमिका बदलावी लागेल. आजच महाराष्ट्र शासन सप्टेंबर १९९१ वरून ऑक्टोबर १९९२ पर्यंत म्हणजे १३ महिन्यांनी पुढे आलेले आहेच ना?**

**३०.** आंदोलनाची नोटीस दिल्यावर सुद्धा दोन चार महिन्यांनी महासंघाला चर्चेसाठी बोलाविणाऱ्या शासनातर्फे, तसेच खुद्द मा. उच्च न्यायालयासमोर शपथपत्र दाखल करण्यासाठी वारंवार वेळ मागून घेणाऱ्या शासनातर्फे, येथे गुणवंताच्या हाकाटीबाबत मात्र दुसऱ्या तिसऱ्या दिवशीच खुलासा करण्यात आला. प्रश्न साटेलोटे असण्याचा आहे. गुणवंत प्राध्यापक व शासनातील काही अधिकाऱ्यांनी शासनातर्फे खुलासे प्रतिखुलासे देण्याची ही जी खेळी सुरू केली त्याला कोणत्याही स्तरावरील संघटनाचे पदाधिकारी बळी पडले नाहीत. काही प्राध्यापकांनी पत्रकार परिषद घ्यावी काय? वृत्तपत्रीय निवेदन काढावे काय? अशी विचारणा केली असता महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी ठामपणे "जे काय मांडायचे असेल ते न्यायालयासमोरच मांडा" अशी ठाम भूमिका घेतल्याचे सांगण्यात आले. गुणवंत प्राध्यापकांनी याबाबत पेपरबाजी करण्यापेक्षा त्यांचे जे काय मुद्दे असतील ते मा. न्यायदेवते समोर मांडण्यामुळेच, त्यांच्या मुद्यात काही दम असला तर, त्यांच्या मुद्यांना न्याय मिळेल. नेट-सेट मुक्त शिक्षकांनी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी न्यायालयीन संघर्षाकडे संपूर्ण लक्ष केंद्रित करण्याचाच निर्णय योग्य आहे. (१) कोणकोणत्या मुद्यांच्या बाबतीत मा. न्यायालयाकडून आतापावेतो निर्णय मिळालेले आहेत हे एक (२) दुसरे

म्हणजे कोणकोणते महत्वाचे मुद्दे न्यायालयासमोर मांडले गेले आहेत व त्यावर अजून निर्णय व्हावयाचा आहे. तेथे प्रभावीपणे ते मुद्दे मांडण्यासाठी कायदेतज्ज्ञांचे आणखी बळ उभे करण्यासाठी काय केले पाहिजे. (३) मा. उच्च न्यायालयासमोर अजूनही मांडले गेले नाहीत असे काही महत्वाचे मुद्दे आहेत काय? असल्यास ते कोणते? व ते मांडण्यासाठी काय केले पाहिजे हे तिसरे, या तीन मुद्यांवर मा. उच्च न्यायालयासमोरील संघर्षात कष्टपूर्वक व मेहनतीने सहभागी झाले पाहिजे.

**३१.** या संदर्भात हे लक्षात घेतले पाहिजे की सर्वसाधारणपणे जे खटले मा. सर्वोच्च न्यायालयाकडे पुनर्निर्णयासाठी येऊ शकतात, त्यामध्ये उपरोक्त प्रकरणे बसत नाहीत. मात्र भारतीय संविधानाच्या १३६ व्या कलमानुसार खटले पुनर्निर्णयासाठी घेण्याची विशेष सत्ता मा. सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आली आहे. भारतातील कोणत्याही न्यायालयाने किंवा लवादाने दिलेला निकाल विशेष परवानगीने (Special Leave) हे न्यायालय पुनर्निर्णयासाठी सुनावणीस घेऊ शकते. राज्य शासनातर्फे अपिलासाठी विशेष परवानगी मागणारा अर्ज (Special Leave Petition : SLP in short ) सर्वोच्च न्यायालयापुढे दाखल केला जाईलच याबाबतचे तपशील उपलब्ध होत आहेत हे लक्षात घेऊन न्यायालयीन संघर्षामध्ये कोणतीही शिथिलता येऊ देता कामा नये. **३ ते ४ हजार शिक्षकांना यापूर्वी देण्यात आलेले लाभ काढून घ्यायचे की मा. उच्च न्यायालयांच्या आतापर्यंतच्या निर्णयामुळे इतर ५ ते ६ हजार शिक्षकांना ते अनुज्ञेय ठरवावयाचे हा महत्त्वाचा मुद्दा इतर मुद्यासोबत एसएलपीच्या वेळी मा. सर्वोच्च न्यायालयापुढे येईल.**

**३२.** हे प्रकरण नक्की सर्वोच्च न्यायालयात जाईल हे गृहित धरण्याचे मुख्य कारण म्हणजे सर्व स्तरावरच्या शिक्षकांबद्दल कांही अधिकाऱ्यांच्या मनामध्ये तीव्र आकसाची भावना असल्यामुळे सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करतांना सर्वच स्तरावरील शिक्षकांना अत्यंत निम्न दर्जाची वागणूक देण्यात आली. हकीम सारख्या एका सनदी अधिकाऱ्याचा वापर करून नोकरशाहीने हे जे कारस्थान पार पाडले त्याला राजकीय नेतृत्त्वसुद्धा आवर घालू शकले नाही. वस्तुतः "राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारसीवरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय (Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales) **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल.**" असा धोरणात्मक निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये राज्यशासनाने घेतला होता. आजपावेतो या धोरणात्मक निर्णयामध्ये शासनाच्या स्तरावर बदल झालेला नाही.

**३३.** राज्यशासनाचा उपरोक्त धोरणात्मक निर्णय आजही कायम आहे. तो बदललेला नाही असे असतांना सर्व स्तरावरच्या शिक्षकांच्या ग्रेड पे मध्ये मोठ्या प्रमाणात कापाकापी करण्यात आली. काही बाबतीत तर पे बँड सुद्धा बदलण्यात आले. ही कापाकापी किती निर्दयपणे करण्यात आलेली आहे हे पहाण्यासारखे आहे.

(१) **प्राथमिक शिक्षक :** सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीवर केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षकाला मूळ वेतनश्रेणीसाठी दुसऱ्या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४२०० रुपये ग्रेड पे दिला आहे. तो कापून राज्य शासनाने त्याला दुसऱ्या म्हणजे ४८०० वर सुरू होणाऱ्या पे बँड मधून पहिल्या म्हणजे २८०० रुपयावर सुरू होणाऱ्या पे बँड मध्ये ढकलून दिले व त्यांचा ग्रेड पे ४२०० वरून २८०० वर आणला.म्हणजे पे बँड कापला व ग्रेड पे सुद्धा कापला. प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ श्रेणीला केंद्राने ४६०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्य शासनाने तो ४२०० रुपये ग्रेड पे केला. निवडश्रेणीला केंद्राने ४८०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्यशासनाने तो ४३०० रुपये केला.

(२) **माध्यमिक शिक्षक :** केंद्राने मुळ वेतनश्रेणीसाठी दुसऱ्या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४६०० रुपये ग्रेड पे दिला आहे तो कापून राज्यशासनाने ४३०० रुपये केला. वरिष्ठ श्रेणीला केंद्राने ४८०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्यशासनाने तो ४४०० रुपये केला व निवडश्रेणीला केंद्राने दिलेले ५४०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्यशासनाने ४८०० रुपये केला.

(३) **कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक :** केंद्राने मुळ वेतनश्रेणीसाठी दुसऱ्या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४८०० रुपये ग्रेड पे दिला तर तो कापून राज्यशासनाने ४६०० रुपये केला निवडश्रेणीबाबत केंद्रशासनाने दिलेल्या ६६०० रुपये ग्रेड पे मध्ये मोठी कपात करून राज्यशासनाने तो ग्रेड पे ५७०० रुपये केला.

(४) **विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक :** या वर्गाबद्दल तर अधिकाऱ्यांच्या आकसपूर्ण वागणूकीने कमाल मर्यादा गाठलेली दिसते. **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू केल्या तर जवळ जवळ १५०० ते १८०० कोटी रुपयाचे केंद्र शासनाकडून मिळणारे अर्थसहाय्य नाही मिळाले तरी चालेल** पण या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्याऐवजी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्याच वेतनश्रेण्या लागू करण्याचा या अधिकाऱ्यांनी निर्धार केला होता. २२ जुलै २००९ रोजी नाशिक येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तसा प्रस्ताव ठेवला पण त्या दिवशी निर्णय करवून घेणे त्यांना शक्य झाले नाही. मात्र दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक २३ जुलै २००९ रोजी मुंबई येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता मिळविण्यात आली व २४ जुलै २००९ रोजी महासंघाच्या अध्यक्षांना ताबडतोब पत्र लिहून तो निर्णय कळविण्यात आला. याच प्रस्तावात नेटसेट ग्रस्त शिक्षकांच्याबाबतीत अत्यंत दुष्टपणाचा निर्णय घेण्यात आला होता. या शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगातील कोणतीही वेतनश्रेणी (अगदी तळातली सुद्धा) लागू करावयाची नाही. आहे त्याच वेतनावर त्यांना ठेवावयाचे व ते नेटसेट पात्रता प्राप्त करतील तेव्हा पुढील विचार करावयाचा असा निर्णय घेण्यात आला व तशा तरतुदींचा शासननिर्णय सुद्धा १२ ऑगस्ट २००९ रोजी निर्गमित करण्यात आला होता. या दोनही प्रस्तावातील दुष्टपणा पुढे शासनाला गिळावा लागला ही गोष्ट वेगळी.

**३४.** खरे म्हणजे मा. उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठानी निर्णय दिल्यावर हा संघर्ष थांबायला हवा. पण तसे होणार नाही. या संघर्षाचा शेवट मा. सर्वोच्च न्यायालयामध्येच होईल हे सुद्धा पक्के लक्षात ठेवले पाहिजे. साटेलोटे असलेल्या **या अधिकाऱ्यांनी आकस बुद्धीने एसएलपी साठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला शासनाला दिला आहे व राजकीय नेत्यांनी तो सल्ला मानलेला आहे.** राजकीय नेतृत्वाबद्दल तर काही बोलायलाच नको. सप्टेंबर १९९१ नंतरच्या "पहिल्या तेरा महिन्यात महाराष्ट्रात नेटसेट बाबतचा जी.आर.काढलाच नव्हता" हे आता जून २०१३ मध्ये सांगणाऱ्या अधिकाऱ्यांनी ६ मार्च २०१३ रोजी मंत्रिमंडळात निर्णय होत असतांना तसे कां सांगितले नाही? या अपराधाबद्दल अधिकाऱ्यांच्या केसालाही हात लावण्याची हिम्मत नसलेल्या राजकीय नेत्यांना उद्या जेव्हा "सन २००० पर्यंत असा शासननिर्णय काढलाच नव्हता" असे हेच अधिकारी सांगतील तेंव्हा हे राजकीय नेते आपल्या कशालाही हात लावू शकत नाहीत याची त्या अधिकाऱ्यांना पूर्ण खात्री असेल.

**३५.** शिक्षकांविषयीच्या एकूणच आकसातून व नेटसेटमुक्त शिक्षकांबाबत एकामागून एक मा. उच्च न्यायालयातून धडका बसत असल्यामुळे पित्त खवळलेल्या अधिकाऱ्यांकडून एसएलपीचा प्रस्ताव मांडला गेला व राजकीय नेतृत्वाने त्याला माना डोलावल्या. एसएलपीचा अर्ज मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयापासून ९० दिवसाच्या आत दाखल करावयाचा असतो. नेटसेट बाबत मा. औरंगाबाद खंडपीठासमोर जो पहिला निकाल लागला त्याबाबत शासनाने असा अर्ज मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक ७ ऑक्टोबर २०१३ रोजी दाखल केला असल्याचे दिसून येते. त्यात काही त्रुटी असल्याचे तेथे छाननीत आढळून आले असून त्या त्रुटी राज्यशासनाच्या वकिलांनी दूर केल्या असून आता या SLP ची सुनावणी १८ नोव्हेंबर २०१३ रोजी ठेवण्यात आली आहे. त्रुटी दुरुस्त करण्यापूर्वीचे याबाबतचे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असलेले तपशील याच अंकात पृष्ठ २१९ वर प्रसृत केलेले आहेत. सारांश काय तर मा. उच्च न्यायालयातील संघर्ष संपल्यावर किंवा सुरू असतांनाच मा. सर्वोच्च न्यायालयातील संघर्षाचीसुद्धा उभारणी करण्यासाठी तयारीला लागणे हाच त्यावरचा एकमेव उपाय आहे.

*****

It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by Government of Maharashtra providing for eligibility tests by UGC or tests accredited by UGC

*( See Para 9 of the High Court Judgement on page 235 of 2013 NUTA Bulletin )*

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, BENCH AT AURANGABAD.

# WRIT PETITION NO. 10149 OF 2010

**(01)** Dr. Mahesh S/o Prabhakar Kulthe, Age 39, Occ. Assistant Professor, Vasantrao Naik Mahavidyalaya, Aurangabad-431 003 **(02)** Dr. Sanjay S/o Ramchandra Kamble, Age 41, Occu. Assistant Professor, Shikshan Maharshi Dyndeo Mohekar Mahavidyalalya, Kalamb, Dist. Osmanabad. **(03 to 203 Not printed)** **(204)** Dr. Nishat Parveen D/o Md. Sayeeduddin Momin, Age 39 years, Occu.Assistant Professor, Sir Sayyed College, Auranabad **(205)** Smt. Meena D/o Narhar Sakhalkar, Age 45 years, Occu.Assistant Professor, Shikshan Maharshi Dyndeo Mohekar Mahavidyalaya Kalamb, Dist.Osmanabad. *PETITIONERS* **VERSUS (1)** The Union of India through The Secretary in the Department of Human Resources Development Shastri Bhavan, New Delhi **(2)** The University Grants Commission Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110 002. ( through its Secretary) **(3)** The State of Maharashtra through the Principal Secretary to Government of Maharashtra, Department of Higher Education, Mantralaya, Mumbai-400 032. **(4)** Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad through it's Registrar. *RESPONDENTS*

Mr. Pradeep G. Deshmukh Advocate for Petitioners : Mr. Alok Sharma, Assistant Solicitor General of India for Resp. no. 1 & 2 : Mr. D.B. Bhange, Assistant Government Pleader for Respondent No. 3
Mr. K.M. Suryawanshi, Advocate for Respondent no. 4 - University

## CORAM : R. M. BORDE AND SUNIL P. DESHMUKH, JJ.

## OCTOBER 17, 2013

## Judgment (Per: Sunil P. Deshmukh, J.)

1. Rule. By consent, rule made returnable forthwith and heard finally.

2. Consideration of petitioners' cases by University Grants Commission ("UGC" for short) for decision with regard to exemption from National Eligibility Test/State Level Eligibility Test ("NET/SLET" for brevity) for some reason or the other had got delayed and as petitioners' luck would have it, directions were issued by the Ministry of Human Resources Development ("HRD Ministry" for convenience) dated 30-03-2010, cascading into stalling the benefit of exemption from passing NET/SLET examination which had been made available by UGC to other cases of appointments during the period 1991 to 2000. **It appears that UGC had decided not to grant exemption as decided in meeting dated 23-02-2010, in view of communication received from HRD Ministry dated 30-03-2010**.

3. The Petitioners as such purport to question and challenge propriety and validity of order dated 30-03-2010 passed by the Ministry of Human Resources Development, Union of India, and seek directions to UGC to consider and decide proposals submitted through Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University (for brevity "BAMU") for granting exemption to lecturers from passing **NET / SLET and not to shelve consideration of proposals for such exemptions giving rise to discrimination among similarly placed Lecturers/ Assistant Professors.**

4. All the petitioners claim to have been appointed during the period from 1991 to 2000 by following due process for **selection and appointment viz. advertisement inviting applications, selection by duly constituted committee and the petitioners possess all the required educational qualifications** except of passing NET/SLET pursuant to eligibility criteria as was required then according to the norms of concerned universities/authorities. Petitioners were required to be appointed as candidates having NET/SLET were not available.

5. Petitioners' appointments have received approval from BAMU after scrutiny of their proposals. Petitioners claim to have been performing and discharging their duty to the satisfaction of all concerned. Petitioners' cases were sent to UGC to consider them for exemption from passing NET/SLET.

6. According to the petitioners, the national policy of making NET/SLET compulsory was made effective from 2005 and it would not apply to appointments made prior to the same and more so in cases of petitioners. It is contended by petitioners that it is highly improper to detain their proposals for granting exemption from NET/SLET since their appointments are during the period 1991-2000. Petitioners submit, they are entitled to the claim of exemption from NET/SLET as in the cases of other lecturers/Assistant Professors who are appointed during 1991-2000 on parity and equality of treatment. **The petitioners contend that they are required to be treated as regular lecturers from the dates of their initial appointment.**

7. The petitioners have annexed Exhibit D at page 72 of petition the minutes of meeting dated 23-02-2010 and have pointed out the decision of the UGC at item 6.04 and 6.05 of the same which is as under:-

**"** Section -6
Miscellaneous
6.01 ......................................
6.02 .....................................
6.03 ......................................

6.04 To consider the specific requests received from various Universities for granting exemptions from NET for appointments as Lecturers.

***The Commission considered the request received from various Universities for granting exemptions from NET for appointment as Lecturers and approved the recommendations of the Committee constituted for the purpose. Action : JS (PS)***

6.05 To consider the question of giving exemption from NET for appointment as Lecturers.

***The Commission considered the need for providing exemption arising out of the decisions of the various High Courts and decided that the exemption in respect of non- NET/SLET qualified teachers under the provisions of UGC Regulations 1991/2000 may be continued and processed accordingly. Action : (JS(PS)***
"

8. The Petitioners have annexed at Exhibit E to the petition, directions of the HRD Ministry, Department of Higher Education, Government of India. From the same, it emerges that UGC had made NET/SLET or Ph. D. to be minimum qualification for appointment to the teaching staff of the universities and other institutions imparting higher education, under its meeting held on 21-05-2008 and pursuant to which, UGC had been directed to frame appropriate regulations making NET/SLET and/or Ph.D. to be compulsory. Pursuant to the same, UGC had notified regulations in 2009 referring to that NET/SLET would be the requirement and exemption would be available in respect of the same only to persons obtaining Ph. D. in accordance with standards and norms prescribed by UGC.

9. **It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by government of Maharashtra providing for eligibility tests by UGC** or tests accredited by UGC and further that M. Phil. or doctorate award pursuant to the same was not necessary save that the candidate should possess educational qualification and additionally, the NET. It has been pointed out that the UGC from time to time has been granting exemptions upon certain terms.

10. It appears from the same, even till December-1998, UGC had considered that the qualifications as required in the regulations of 1991 were maintained, however, the cases of Ph.D holders were left to the discretion of university for granting of exemption from NET/SLET.

11. It appears that in 2000, the State government was **directed by UGC to make NET/SLET qualification necessary and thereupon, government resolution had been issued directing termination of services of persons appointed after 11-12-1999.** However, the High Court had intervened, directing that cases of teachers be sent to UGC for claiming exemptions.

12. It appears by 2006 regulations, exemption came to be granted for Ph.D. holders from acquiring NET for teaching post graduate courses, so also candidates who were possessing M. Phil. were exempted.

13. During 2007-2010, respective colleges had sent proposals for exemption to the university and the university, in turn, had sent the same to UGC. Some queries had been raised which appear to have been answered, but no decision had been taken by UGC.

14. Petitioners point out that three appointments made in 1993, 1998 and 1999 were given relaxation. It has been submitted that pursuant to the decision dated 27-11-2008 of Nagpur Bench of High Court, UGC granted exemptions in favour of lecturers of some universities. A decision was taken to grant exemption in respect lecturers whose proposals were taken for consideration in the meeting of UGC held on 23-02-2010 and the petitioners' proposals were likely to be considered in the subsequent meetings.

15. Petitioners submit that having been appointed during the period 1991-2000, non consideration of their cases for granting exemptions **in view of the directives of HRD Ministry dated 30-03-2010, is improper, discriminatory and capricious**. The UGC regulations of 2009 as well as directives of HRD Ministry cannot hold back consideration by UGC of petitioners' cases for exemption and those regulations and directives would be applicable only to the subsequent appointments.

16. Petitioners state that in large number of cases pursuant to the decision dated 08-07-2011, benefits of exemption have been given. **Thus, the cases have been considered even after 30-03-2010.** Petitioners submit that they are perhaps on better footing to be considered for exemption and be granted exemption.

17. It appears that UGC was directed by HRD Ministry vide its decision dated 30-03-2010, not to take up specific cases for exemption after enforcement of regulations of **2009 with further directions for withdrawing decision dated 23-02-2010.**

18. It appears from paragraph 25 of reply of UGC to this petition that, the UGC had discussed the issue for exemption from NET/SLET and HRD Ministry suggested that a committee may be constituted by chairman of UGC to look into the issue and advise the commission on exemption from passing NET/SLET.

19. It was also considered by UGC to comply with directions issued by various High Courts and even 2010 regulations provide for exemption from NET/SLET. However, the UGC purports to express inability to consider **the petitioners' cases in view of the directives of the HRD Ministry dated 30-03-2010.**

20. The petitioners refer to and rely on decisions rendered by this court in writ petition no. 5271 of 2013 and companion petitions decided on 28-08-2013.

21. This court had considered that pursuant to directions to UGC by Division Bench of this court at Nagpur dated 20-04-2011 in Writ Petition No. 4908 of 2010, UGC in its meeting held on 08-07-2011 had resolved and accordingly **on 16-08-2011 communicated the same to the General Secretary of Maharashtra Federation of University and College Teachers Organization** with reference to its representation dated 17th August, 2011 as under:-

*"Kindly referred to your representation dated 17th August, 2011 on the subject mentioned above. The issue raised in the representation has been examined in the UGC and this is to inform you that, the Commission in its meeting held on 08-07-2011 considered the representation received in respect of lecturers appointed in the State of Maharashtra from 19th September, 1991 till 3rd April 2001 and resolved as under:-*

*" The Commission deliberated on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19, 1991 until April 3, 2000 and resolved that, all such appointments made on regular basis by various Universities in the State of Maharashtra where the University has granted exemption to teacher from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent notification dated 24.12.1998 and where the representation has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointment made during the said period w. e. f. September 19, 1991 till April 3, 2000 is approved. ...."*

*The above decision (dated 08-07-2011) of the Commission has alreadybeen communicated by the UGC vide its letter No. F-1-1/2002 (PS) Exemp, Pt. File IV dated 16th August 2011 to the Principal Secretary, State of Maharashtra, Higher and Technical Education Department, Mumbai.*

*As may be seen from the above decision of the Commission, the Commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 1991 to April 3, 2000. Therefore, the services of such teachers for all purpose should be counted from the date of their regular appointment."*

22. The High Court has further taken note of the fact that in Writ Petition (Stamp) No. 1326 of 2012 at Principal Seat of High Court, a statement was made on behalf of the State Government that a Resolution would be issued exempting teachers who were appointed after following prescribed procedure during the period from 19-09-1991 to 03-04-2000, protecting their pay fixation, including

increments already paid to them and from recovery of annual increments which they had already earned and pursuant to which government resolution dated 27-06-2013 has been issued.

23. Petitioners draw our attention to that High Court had considered quite a few writ petitions by persons who have been appointed during the period 1991 to 2000 and taking into account overall situation and the relevant aspects, particularly the government resolution dated 27-06-2013, a Division Bench of this Court in Writ Petition No. 11477 of 2010 decided on 01-08-2013 had dealt with a situation wherein Career Advancement Scheme benefits were not being accorded to petitioners in the writ petition on the ground that their period of entitlement would be computed from the date of exemption by UGC.

24. After taking into account government resolution dated 27-06-2013, the court has considered that the government of Maharashtra had decided to hold the lecturers appointed during 1991-2000 who do not possess NET/SLET/Ph.D. eligible for all purposes on fulfillment of following conditions:-

"*(a) Their appointments should be on regular basis*

*(b) Their appointments should be made after following the prescribed procedure.*

*(c) The lecturers shall have all other qualifications except NET/SET*

*(d) Proposals of such lecturers should have been forwarded to the UGC for approval."*

25. In the present case as well, the position is undisputed that the petitioners have been appointed during the period 19-09-1991 to 03-04-2000 by following due procedure viz. their selection by duly constituted committee; possessing of the educational qualifications as were applicable then save they had not passed NET/SLET examination and further that their appointments had undergone requisite scrutiny and had received approval. Majority of the petitioners have also improved their qualification during service period.

26. On perusal of the directions of the HRD Ministry dated 30-3-2010, it can hardly be said in the wake of resolutions of the UGC and the exemptions as were made applicable to the appointments of lecturers/teachers made during the period from September 1991 to April 2000, those would apply to and cover the appointments of petitioners. As such, it would not be appropriate to keep the present set of petitioners away from the benefit ensuing from decisions taken under such resolution passed prior to the directions issued by HRD Ministry on 30-03-2010 and even after the same particularly resolution dated 08-07-2011 referred to hereinabove, **in the cases which involve closely identical facts and circumstances.**

27. In the affidavit by UGC, an extract of decision of Delhi High Court in ***WP (C) No. 13689 of 2009 (All India Researchers' Coordination Committee and ors. vs. Union of India and ors.)*** and ***WP (C) 2780 of 2010 (Sarika Chaudhary vs. Union of India and ors)*** has been produced. While deciding against the challenge to validity of UGC's third amendment to Regulations, 2009, it has been observed:-

*"36. Further, we find that Regulations 2009 are in no way retrospective in nature. In fact, they are prospective in as much as they apply to appointments made or proposed to be made after the date of notification and do not apply to appointments made on regular basis prior to the said date. "*

28. **After going through the directions issued by HRD Ministry on 30-03-2010, it appears that those may at the most govern the appointments subsequent to 2008** and it appears that the factual position in respect of appointments as subsisting in the State had not been apprised of while such directions were issued.

29. In view of this and having regard to the earlier decisions of this court and particularly the subsequent resolution by UGC after 30-03-2010 as referred to above, keeping away the petitioners cases from being considered **for the benefit of exemption with reference to the directions of the HRD Ministry would give rise to invidious discrimination among similarly situated persons under the capricious decisions leaving the petitioners in lurch.**

30. We are, therefore, of the view that the petitioners' cases would be required and eligible to be legitimately considered for the benefit of exemption on analogy with resolutions referred to earlier hereinabove. **The decision / directions dated 30-03-2010 of the HRD Ministry, Union of India, would not be able to hold back the benefits under the decision of the UGC.** It would, therefore, not be necessary for us to go into the propriety and legality of the directions issued by the HRD Ministry dated 30-03-2010 which are purportedly impugned in the present petition.

31. We, therefore, direct the concerned authorities to consider petitioners' cases for grant of exemption from passing NET/SLET with reference to observations hereinabove and give them consequential and incidental benefits. **We expect that such exercise would be done expeditiously, preferably within a period of four months without being trammeled by decision / direction dated 30-03-2010 of HRD Ministry.**

32. Writ Petition is thus allowed. Rule is made absolute in aforesaid terms. No order as to costs.

(SUNIL P. DESHMUKH, J.) (R.M. BORDE, J.)

** AF : P 139 **

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **15.11.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

To,............................................................................

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

....................................................................................